






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १६.१०.२०२५ | अंक नं. १६६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







# मनपा प्रभागरचना प्रकरणी तत्काळ अहवाल देण्याचे राज्य निवडणूक आयोगाचे ‘नगर विकास’ला आदेश

## ठाकरे शिवसेनेने केली होती तक्रार; मुख्यमंत्र्यांच्या फोनमुळे रचना रखडल्याचा किरण काळेंचा आरोप

नगर – मुदत उलटून ही मनपाची अंतिम प्रभाग रचना अद्यापही जाहीर नाही. पहिल्यांदाच अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ठाकरे शिवसेनेच्या वतीने शहर प्रमुख किरण काळे यांनी यावर आक्षेप घेत राजकीय हस्तक्षेप होत असल्याची लेखी तक्रार १४ ऑक्टोबरला राज्य निवडणूक आयोगाकडे केली होती. त्याची दखल आयोगाने घेतली आहे. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशाने आयोगाने नगर विकास विभागाला अंतिम प्रभाग रचना प्रकरणी तत्काळ वस्तुस्थितीदर्शक सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

भाजप, राष्ट्रवादी, शिंदे सेना यांच्या सुरू असलेल्या प्रभाग चोरीचा जनते समोर आता भांडाफोड झाला असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे. ठाकरे शिवसेनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील आरोप केला आहे. शहर प्रमुख काळे म्हणाले, उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या बोलवण्यावरून शहर लोकप्रतिनिधी मुंबईला गेल्याचे सांगितले गेले. माध्यमांमधून तसे दिसले. मात्र त्याच वेळी आमदारांनी मुख्यमंत्र्यांची देखील भेट घेतली. त्यांच्या सांगण्यावरून फडणवीस यांनी नगर विकास विभागावर फोन करून दबाव आणला. उपमुख्यमंत्र्यांनी अजित पवारांनी देखील यात हस्तक्षेप केला आहे. दुसरीकडे शिंदे सेनेचे स्थानिक इच्छुक यांनी नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्फत दबाव आणला. आपापसातील अंतर्गत कुरघोडी, पराभवाची भीती यामुळे मंत्रालयात बसून सत्ताधारी प्रभागांची चोरी करत असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे.

किरण काळे यांनी तक्रारीत सहा मागण्या केल्या होत्या. त्यांनी म्हटले होते, आयोगाने नगर विकास विभागावर कारवाई करावी. आत्तापर्यंत राबवलेली सर्व प्रक्रिया रद्द करावी. ती नव्याने राबवावी. नव्या प्रक्रियेमध्ये राजकीय हस्तक्षेप नको. प्रक्रियेतील १००% पारदर्शकता आणावी.

### सत्ताधाऱ्यांनी नैतिकता गमावली

शहरात सत्ताधाऱ्यांना निवडणुका पारदर्शक वातावरणात *(पुढील मजकूर पान २ वर)*






























जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगरमध्ये ड्रंक अ‍ॅण्ड ड्राइव्ह, फॅन्सी नंबर प्लेट, विना नंबर वाहने चालविणाऱ्या चालकांवर कारवाई

नगर – नगर शहर परिसरात ड्रंक अँड ड्राइव्ह, फॅन्सी नंबर प्लेट, विना नंबर तसेच मोडीफाईड सायलेन्सर असलेल्या वाहनांवर १५ ऑक्टोबर रोजी शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी अचानक कारवाईची मोहीम राबवत १२० वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली आहे. या कारवाईत १ लाख ५० हजार ७०० रुपये दंड वसूल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या आदेशान्वये उपअधीक्षक टिपरसे यांनी शहर उपविभागातील कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याच्या हद्दीत अचानक नाकाबंदी करून ही मोहीम राबविली. विना नंबर प्लेट, फॅन्सी नंबर, विना हेल्मेट, मोडीफाईड सायलेन्सर यांच्यावर ब्लॅक स्पॉट पेट्रोलिंग व नाकाबंदी दरम्यान मोटार वाहन कायदा अन्वये १२० वाहनांवर कारवाई करून १ लाख ५० हजार ७०० रुपये दंड केला असून २ ड्रंक अ‍ॅण्ड ड्राइव्हचे इसमांवर बीएनएस कलम २८१ सह मोटार वाहन कायदा कलम १८५ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

या मोहिमेत उपअधीक्षक टिपरसे यांच्या सह कोतवालीचे पो.नि. संभाजी गायकवाड, तोफखान्याचे पो.नि. आनंद कोकरे, शहर वाहतूक शाखेचे पो. नि. बाबासाहेब बोरसे, भिंगार कॅम्पचे स.पो. नि. जगदीश मुलगीर यांच्या सह पोलिस कर्मचारी सहभागी झाले होते.

# नगर–शिर्डी राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे, धुळीने भाविक व जनता त्रस्त

**लोकमकात्या टक्केवारी राष्ट्रीय महामार्ग नामकरण; शासनाच्या सत्याचाराचा आरसा; लोकभज्ञाक चळवळ साई–सूर्यनामा आंदोलनातून वेधणार लक्ष**



नगर – गेल्या दहा वर्षांपासून नागरिक आणि भाविकांच्या संयमाचा अंत पाहत असलेला नगर–शिर्डी राष्ट्रीय महामार्ग आज राष्ट्रीय या शब्दालाही लाजवणारा ठरला आहे. विकासाचा मार्ग म्हणून ओळखला जाणारा हा महामार्ग आज खड्डे, धूळ, आणि धोक्यांचा मार्ग बनला असल्याचा आरोप लोकभज्ञाक चळवळीच्या वतीने करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शासनातील भ्रष्टाचार आणि उदासीनतेविरोधात एक आगळेवेगळे आंदोलन उभे केले असून, हा रस्ता आता राष्ट्रीय महामार्ग नव्हे, तर लोकमकात्या टक्केवारी राष्ट्रीय महामार्ग या नावाने ओळखला जाईल, अशी घोषणा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

दररोज हजारो वाहनधारक आणि भाविकांचा जीव या रस्त्यावर धोक्यात असतो. शासनाने चार वेळा ठेकेदार बदलले, अनेकदा मंत्र्यांनी आश्वासनांची फुले उधळली, परंतु प्रत्यक्षात रस्ता आजही अपूर्णच आहे. लोकमकात्या म्हणजे मला काय त्याचं शासनकर्त्यांचा, मंत्र्यांचा आणि ठेकेदारांचा जनतेच्या दुःखाकडे असलेला निर्लज्ज उदासीन दृष्टिकोन. टक्केवारी म्हणजे भ्रष्टाचाराची ती संस्कृती, जिथे काम प्रामाणिकपणाने नव्हे, तर कमिशन आणि व्यवहाराने चालते. या दोन शब्दांच्या संगमातून उभा राहतो तो लोकजागृतीचा प्रतीकात्मक महामार्ग असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकभद्र्यक चळवळीने या नामकरणाला केवळ आंदोलन म्हणून नव्हे, तर आध्यात्मिक आणि नैतिक शुद्धीचा सोहळा ठरवले आहे. या आंदोलनाला साई–सूर्यनामा असे नाव देण्यात आले असून, सूर्यदेवाला सत्य, पारदर्शकता आणि न्यायाचा सनातन साक्षीदार म्हणून हे आंदोलन केले जाण्आर असल्याची माहिती अ‍ॅड.कारभारी गवळी यांनी दिली.

हा रस्ता त्या सत्ताधाऱ्यांच्या अपयशाचा पुरावा आहे. ज्यांनी आपल्या कर्तव्याचा विश्वासघात केला. लोकशाही आता लोकभज्ञाकशाहीत रूपांतरित व्हावी. जी लोकभक्ती (जनसेवा), ज्ञानभक्ती (सत्यजागर), आणि कर्मभक्ती (निष्काम कृती) या त्रिसूत्रीवर उभी आहे. नगर–शिर्डी महामार्ग जो आज भ्रष्टाचाराचे प्रतीक ठरला आहे, तोच आता जनतेच्या चेतनेचा दीपस्तंभ बनत आहे. लोकमकात्या टक्केवारी महामार्ग, या नावाने जनता शासनाला आरसा दाखवत आहे. प्रत्येक खड्डा आज शासनाच्या अपूर्ण वचनांचे स्मारक ठरत आहे. सत्य कधीही भ्रष्टाचाराच्या सावलीत कायम लपून राहू शकत नाही. लोकभद्र्यक चळवळीचा हा जनआक्रोश अखेर शासनाला सत्याचाराच्या दिशेने प्रवृत्त करेल अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे.

या आंदोलनासाठी अ‍ॅड.गवळी, अ‍ॅड. संजय जव्हेरी, अशोक सब्बन, अशोक भोसले, शाहीर कान्हू सुंबे, जालिंदर बोरुडे, प्रकाश थोरात, वीरबहादूर प्रजापती प्रयत्नशील आहेत.

# दिवाळीपूर्वी स्वच्छता, फवारणी आणि रस्त्यांची दुरुस्ती करावी

**स्वप्निल शिंदे यांची मनपाकडे मागणी**



नगर – दिवाळी सण काही दिवसांवर येऊन ठेपला असून नागरिकांच्या आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने वार्ड क्र. १३ मधील सर्व परिसरात तातडीने स्वच्छता मोहीम, औषध फवारणी आणि रस्त्यांवरील खड्ड्यांची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी स्वप्निल शिंदे यांनी निवेदनाद्वारे मनपा आयुक्तांकडे केली आहे.

शिंदे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, मार्केट यार्ड रोड, सत्ता कॉलनी, अरिहंत कॉलनी, नवजीवन कॉलनी, राऊत मळा, कानडे मळा, आशीर्वाद कॉलनी, शांतीनगर, कोंबडीवाला मळा, माळीवाडा, नवीन टिळक रोड, तीन नंबर बसस्थानक, झेंडीगेट, जीपीओ, चंदूकाका सराफ परिसर, कृषी उत्पन्न बाजार समिती, आनंदधाम, गणेशवाडी, नंदनवन कॉलनी, सीएसआरडी, धुत बिल्डिंग, हेरिटेज, जुने बसस्थानक, वाडिया पार्क, सुगंधी चाळ, आर नियोजन भवन, वायएमसी ग्राउंड, सातघर परिसर व एमईसीबी ऑफिस रोड या सर्व भागांमध्ये स्वच्छता व औषध फवारणी करण्यात यावी तसेच रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये मुरूम टाकून दुरुस्ती करावी, वाढलेले गवत तातडीने कापण्यात यावे आणि ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे त्या ठिकाणी त्वरित उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी त्यांनी केली. आणी काही रस्त्यांवर खड्डे व वाढलेले गवत असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून शाळकरी मुलांच्या अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे दिवाळी सुट्ट्यांपूर्वीच हे काम पूर्ण करणे अत्यावश्यक आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि सुंदर दिसावा यासाठी मनपाने त्वरित कारवाई करावी, अशी मागणी स्वप्निल शिंदे यांनी केली आहे.

# मनपा प्रभागरचना प्रकरणी तत्काळ अहवाल देण्याचे ‘नगर विकास’ला आदेश

(पान १ वरुन)

घ्यायच्या नाहीत. मनपा निवडणुकीत जनमत आपल्या विरोधात जाईल याची त्यांना खात्री झाली आहे. पक्ष फोडा फोडीच्या राजकारणात शहरातील विद्यमान ६८ नगरसेवकां पैकी ६६ नगरसेवक हे शहर लोकप्रतिनिधींच्या दावणीला आहेत. त्यांना सुमारे चाळीस हजार मतांची आघाडी विधानसभेला मिळवली आहे. निवडणूक एकतर्फी होईल असं वारंवार सांगितलं जात आहे. मात्र हे साफ खोट आहे. याची त्यांच्या अंतर्मनाला जाणीव झाली आहे. म्हणून स्वतः शहर लोकप्रतिनिधी या प्रक्रियेमध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या माध्यमातून थेट हस्तक्षेप करत आहेत. आयोगाने नगर विकासकडे बोट दाखवून यात चालढकल सुरू केली आहे. शिवसेनेची तक्रार येण्यापूर्वी आयोगाने कारवाई का केली नाही ? आयोग हे सरकारच्या ताटा खालचं मांजर असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे.

### मतदार यादी कार्यक्रम बेकायदेशीर

जाहीर झालेल्या मतदार यादी कार्यक्रमावर ठाकरे शिवसेनेने आक्षेप घेतला आहे. ६ नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार यादी जाहीर केली जाणार आहे. काळे म्हणाले, मुळात अंतिम प्रभाग रचनाच जाहीर झाली नाही. असे असताना मतदार यादी कार्यक्रम जाहीर करणे हे नियमबाह्य आहे.

### तर मग निवडणुकाच घेऊ नका

नगर विकास, आयोग, सत्ताधारी पक्ष, शहर लोकप्रतिनिधी यांनी संगमतातून नगर मनपाची निवडणूक मॅनेज केली आहे. मनमानी सुरू आहे. कायद्याचं राज्य उरलेलं नाही. त्यापेक्षा हुकूमशाही बरी अस म्हणण्याची वेळ आली आहे. अशा पद्धतीन निवडणुका होणार असतील तर मग त्या घेताच कशाला ? इलेक्शन घेण्याऐवजी आपल्या बगल बच्च्यांच सिलेक्शन करून ६८ नगरसेवक सत्ताधार्यांनी जाहीर करून टाकावेत, असा टोला किरण काळे यांनी लगावला आहे.

### आयुक्त डांगेंचे काय होणार?

ठाकरे शिवसेनेने आयोगाकडे निवडणूक कार्यक्रमाचे प्रमुख, प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांच्याविरुद्ध तक्रार केली होती. या प्रक्रियेत आयुक्तांचे वर्तन हे महायुतीचे वैयक्तिक सेवक असल्या सारखे आहे. त्यांच्या जागी स्वच्छ प्रतिमा असलेला सक्षम अधिकारी नियुक्त करण्याची मागणी त्यांनी केली होती. काळे यांच्या संपूर्ण तक्रारीवर वस्तुस्थितीदर्शक सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत.

# प्रारूप प्रभाग रचनेच्या हरकतीवर कार्यवाहीचे निवडणूक आयोगाचे निर्देश

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत घेण्यात आलेल्या हरकतीवर योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने नगर विकास विभागाला दिले आहेत. याबाबतची तक्रार शाकीर शेख यांनी निवडणूक आयोगाकडे केली होती.

महापालिकेची प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध झाल्यावर त्यावर हरकती घेण्यासाठी ३ ते १५ सप्टेंबर अशी मुदत होती. १५ सप्टेंबर रोजी कार्यालयीन वेळ सायंकाळी ५.४५ पर्यंत असताना आयुक्त यशवंत डांगे यांनी दुपारी ३ वाजेपर्यंतच हरकती स्विकारल्या. शाकीर शेख यांनी ३.२२ वाजता मेल वर हरकत पाठविली होती. ती स्वीकारण्यात आली नव्हती. त्यामुळे त्यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीची दखल घेत आयोगाने नगर विकास विभागाला योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

## सोहम जंबुरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – हातमपुरा येथील रहिवासी आर्यन उर्फ सोहम नितीन जंबुरे (वय १९) यांचे १६ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर १७ ऑक्टोबर रोजी लालटाकी येथील लिंगायत गवळी समाज स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.

त्यांच्या मागे आई, वडील, १ बहिण, १ आत्या असा परिवार आहे. अ‍ॅड. नितीन जंबुरे यांचा तो मुलगा होत.

## रायलिंगु श्रीपत यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – श्रमिकनगर येथील रहिवासी रायलिंगु रायमल्लु श्रीपत (वय ८५) यांचे १५ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मनोहर श्रीपत यांचे ते वडील होत. त्यांच्या मागे २ मुली, १ मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## तेजमल पिपाडा यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील तेजमल धनराज पिपाडा (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार देहदान करण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर न.प.चे माजी नगरसेवक नितीन पिपाडा व मुकेश पिपाडा यांचे वडील होत.

## जयकुंवरबाई गादीया यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – भवानीनगर येथील रहिवासी श्रीमती जयकुंवरबाई सुखलाल गादीया (वय ७८) यांचे १६ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुली, सुन, नातवंडे, जावई असा परिवार आहे. रुचिता व ऋत्विक गादीया यांच्या त्या आजी तसेच सौ. संगीता कांकरिया, सुनीता बाफना, कल्पना छाजेड यांच्या मातोश्री होत.

## गणेश क्षिरसागर यांचे अल्पशा आजाराने निधन



अकोले – मुंबई रेल्वे पोलीस (क्राईम ब्रँच) मध्ये कार्यरत असणारे गणेश (दादा) रामनाथ क्षिरसागर (वय ५०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. क्षिरसागर हे प्रेमळ, सुस्वभावी, मितभाषी व परोपकारी स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात भाऊ सुनिल क्षिरसागर (सेवानिवृत्त मुंबई पोलीस), तसेच पत्नी, मुले–मुली, पुतणे–पुतणी असा परिवार आहे. क्षिरसागर हे अकोल्याचे नगरसेवक प्रमोद संतु मंडलिक यांचे आतेभाऊ व संगमनेर पंचायत समिती सदस्या सौ.प्रियंकाताई गडगे यांचे मामा होते.

# कचरा उचलण्यासाठी नागरिकाने घेतला स्वतःचा ट्रॅक्टर; मनपाच्या निष्क्रियतेचा व भोंगळ कारभाराचा परिणाम



नगर – महानगरपालिकेच्या निष्क्रियतेचा व स्वच्छता विभागाच्या भोंगळ कारभाराचा त्रास आता नागरिकांना स्वतःच्या खिशातून सोसावा लागत आहे. सावेडी, पाईपलाईन रोड, हनुमाननगर येथील रहिवासी राजेश सुखदेव पवार यांनी वारंवार तक्रारी करूनही महानगरपालिकेकडून कचरा उचलला गेला नाही म्हणून बारा लाख रुपये खर्च करून स्वतः चा ट्रॅक्टर घेऊन परिसरातील कचरा उचलण्याची जबाबदारी स्वतःवर घेतली आहे.

पवार म्हणाले, आमच्या घराच्या आवारात मोठमोठी झाडं आहेत. दर दोन महिन्यांनी झाडांचा पालापाचोळा, फांद्या आणि नारळाच्या शेंडी कापावी लागते. पण दर चार दिवसांनी येणारी घंटागाडी हा कचरा घेऊन जात नाही. महानगरपालिकेकडे झाडांचा पालापाचोळा उचलण्यासाठी स्वतंत्र गाड्या आहेत, पण त्या इथे कधीच येत नाहीत. कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना वारंवार सांगूनही काहीच प्रतिसाद मिळाला नाही. पूर्वी आम्ही पैसे देऊन खाजगी वाहनातून हा कचरा उचलून टाकत होतो. पण हे वारंवार घडू लागल्याने आता आम्हालाच नवीन ट्रॅक्टर ट्रॉली घ्यावी लागली. कर वेळेवर भरतो, तरीही आम्हालाच हा खर्च करावा लागतो – हे प्रशासनाचे अपयश आहे, असे पवार यांनी सांगितले. हनुमाननगर परिसरातील इतर नागरिकांनीही अशाच तक्रारी केल्या आहेत. झाडांच्या फांद्या, मोठा कचरा किंवा बांधकामातील अवशेष उचलण्यासाठी महानगरपालिकेच्या गाड्या कधीच दिसत नाहीत. परिसरातील कचरा वाढत असल्याने आरोग्य धोक्यात आले आहे, अशीही नाराजी व्यक्त करण्यात आली.

महानगरपालिका ‘स्वच्छ शहर’चे दावे करत असली तरी प्रत्यक्षात नागरिकांना स्वतःच स्वच्छतेची जबाबदारी उचलावी लागत आहे.

कर भरूनही सेवा न मिळणं ही नागरिकांची दुहेरी शिक्षा ठरत आहे.

आम्ही ट्रॅक्टर घ्यायचा, कचरा उचलायचा आणि भरायचा... मग महानगरपालिकेचं काम नक्की काय? असा सवालही नागरिक करु लागले आहेत.

## नगरमध्ये २ तरुणांच्या गळफास घेत आत्महत्या

नगर – एकाच दिवशी २ तरुणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या २ वेगवेगळ्या घटना नगर शहरातील रेल्वे स्टेशन जवळील कापरे मळा आणि नगर तालुक्यातील आगडगाव शिवारात १५ ऑक्टोबर रोजी घडल्या आहेत.सागर अनिल शिंदे (वय २५, रा. कापरे मळा, रेल्वे स्टेशन) व बद्रीनाथ नारायण निपाणे (वय ३२, रा. रांजणी, कौडगाव, ता.नगर) अशी मयतांची नावे आहेत.

यातील सागर शिंदे हा दुपारी ४.३० च्या सुमारास घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यास त्याचे नातेवाईक रवि सोनवणे यांनी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. कोल्हे यांनी त्यास तपासून तो औषधोपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे घोषित केले.याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

तर बद्रीनाथ नारायण निपाणे हा आगडगाव शिवारात असलेल्या पोखर्णा माता मंदिराजवळ सकाळी १०.३० च्या सुमारास गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यास त्याचे नातेवाईक राजेंद्र शिवाजी निपाणे यांनी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. अमर कुटाळे यांनी त्यास तपासून तो औषधोपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे घोषित केले.याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांप्रती अधिकाऱ्यांनी संवेदनशील राहावे

**जागृती कार्यशाळेत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सूचना**



दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांप्रती संवेदनशीलता–जागृती कार्यशाळेमध्ये जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी अधिकाऱ्यांना शपथ दिली.

नगर – दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिक समाजातील एक महत्त्वाचा घटक आहेत. जिल्ह्यात दिव्यांगांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात ‘दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६’ च्या कलम ३९ अन्वये तसेच ‘ज्येष्ठ नागरिकांचा देखभाल व कल्याण अधिनियम, २००७’ अन्वये संवेदनशीलता–जागृती कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी देवीदास कोकाटे, सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी शासन विविध कल्याणकारी योजना राबवून त्यांच्या स्वाभिमानाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करते. त्यादृष्टीने सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या घटकांप्रती संवेदनशील राहून त्यांना आधार द्यावा, जेणेकरून ते समाजात ताठ मानेने उभे राहू शकतील आणि आनंदी आयुष्य जगू शकतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भंडारी म्हणाले, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांप्रती सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तळमळीने काम करणे आवश्यक आहे. त्यांना शिक्षणासह समाजाचा अभिमानास्पद भाग म्हणून उभे राहण्यासाठी मदत केली पाहिजे. जिल्हा परिषदेमार्फत दिव्यांग कल्याण निधीचा योग्य विनियोग करून दिव्यांगांना त्यांच्या हक्कांचा लाभ मिळाला पाहिजे. विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवल्यास त्यांना समाधानाने, आनंदी आयुष्य जगता येईल.

प्रास्ताविकात देवीदास कोकाटे यांनी सांगितले की, शासकीय अधिकाऱ्यांनी दिव्यांगांच्या हक्कांबाबत, संबंधित कायद्यांबाबत तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींबाबत अधिक संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक आहे.

कार्यक्रमात दिव्यांग हक्क अधिनियम, शिक्षण, आरोग्य व पुनर्वसन, सुगम्य भारत अभियान, ज्येष्ठ नागरिक कायदा, कौशल्य विकास योजना आणि विविध कल्याणकारी योजनांबाबत विधी अधिकारी राजेश मोरे, डॉ. दीपक अनाप, डॉ. जी. पी. शेख, संजय साळवे व शुभदा पाठक यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. संजय साळवे यांनी आभार मानले.

## धनादेश न वटल्या प्रकरणी ५०,००० रुपयांचा दंड व तीन महिने कारावासाची शिक्षा

नगर – महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार, अहमदनगर यांच्याकडून महेश सुरेश रायकवाड, रा. १०४५, जोशी गल्ली, भिंगार, अहमदनगर यांनी सन २०१० मध्ये रक्कम रुपये २०,००० चे कर्ज घेतले होते.

सदर कर्जाच्या थकबाकीपोटी आरोपी महेश सुरेश रायकवाड यांनी फिर्यादी महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार, अहमदनगर यांना दिलेला रक्कम रुपये ४३,००० चा धनादेश अनादरीत झाल्याने पतसंस्थेने आरोपी विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् अ‍ॅक्ट १८८१ चे कलम १३८ प्रमाणे फिर्याद दाखल केली होती. सदर खटल्याच्या गुणदोषावर न्यायनिर्णय होऊन ६ वे अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी श्रीमती प्रतिभा ए. पाटील यांनी आरोपी महेश सुरेश रायकवाड यांना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् अ‍ॅक्ट १८८१ चे कलम १३८ अन्वये दोषी धरुन ३ (तीन) महिने कारावास तथा रक्कम रुपये ४८,००० ची नुकसान भरपाई फिर्यादी पतसंस्थेस देण्याबाबत तसेच नुकसान भरपाईची रक्कम न दिल्यास आणखी १ महिन्याची कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

प्रस्तुत खटल्यामध्ये फिर्यादी पतसंस्थे तर्फे अ‍ॅड. आनंद आर फिरोदिया यांनी कामकाज पाहिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आला पावसाळा आरोग्य सांभाळा

जेव्हा जेव्हा पावसाळा येतो तेव्हा डासांचा धोकाही झपाट्याने वाढतो. घाणेरडे पाणी, ओलसर वातावरण आणि स्वच्छतेचा अभाव, या सर्वांमुळे डासांना वाढण्याची संधी मिळते. आणि हे डास डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, झिका विषाणू आणि फायलेरियासिस सारख्या अनेक धोकादायक आजारांचे वाहक बनतात अशा परिस्थितीत, जर तुम्हाला स्वतःचे आणि तुमच्या कुटुंबाचे आरोग्य या आजारांपासून वाचवायचे असेल तर तुम्हाला आधीच सतर्क राहावे लागेल. यासाठी तुमच्या कूलर, फुलदाणी आणि बादलीतील पाणी दर आठवड्याला बदला. टायर, नारळाच्या कवच आणि तुटलेली भांडी यासारख्या वस्तू छतावर ठेवू नका. छत आणि बागेतील ड्रेनेज स्वच्छ ठेवा. पाण्याच्या टाक्या नेहमी झाकून ठेवा. पावसाळ्यात ताप, डोकेदुखी, स्नायू दुखणे, त्वचेवर लाल पुरळ येणे ही लक्षणे डेंग्यू किंवा मलेरियाची असू शकतात. वेळेवर उपचार न मिळाल्यास हे आजार देखील घातक ठरू शकतात.

## पाककला

### भोपळ्याच्या पुऱ्या

**साहित्य :** २ कप भोपळ्याच्या फोडी, २ कप गुळ, ४ कप गव्हाचे पीठ, १/२ कप तांदळाचे पीठ, १/४ कप बारीक रवा, १ टेबलस्पून तूप, १/२ टीस्पून वेलचीपूड, चवीनुसार मीठ, २ टीस्पून पांढरे तीळ, तळण्यासाठी तेल

**कृती :** भोपळ्याची साल, बिया काढून घ्या. स्वच्छ धुवून बारीक फोडी करून घ्या.. गुळाचे बारीक तुकडे करून घ्यावेत. गुळ आणि भोपळ्याच्या फोडी कुकरच्या डब्यात ठेऊन पाव कप पाणी घालून (पाणी नाही घातले तरी चालते, पण गुळ डब्यात चिकटून राहतो, म्हणून दोन टेबलस्पून तरी पाणी घालावे) कुकरला लावून चार पाच शिट्या काढून घ्या. भोपळ्याच्या फोडी मस्त मऊ सुत शिजतात. थंड झाल्यावर भोपळ्याच्या फोडी मिक्सरच्या भांड्यात घालून मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्या पाण्याची गरज लागलीच तर गुळाचे पाणी घालावे. परातीत गव्हाचे पीठ, तांदळाचे पीठ, रवा, मीठ, वेलचीपूड घालून मिक्स करून घ्यावे. भोपळ्याचे वाटलेले मिश्रण आणि गुळाचे पाणी घालून पीठ घट्ट मळून घ्या. दहा मिनिटे झाकून ठेवा. छोट्या आकाराचे गोळे करून पुऱ्या लाटून घ्या किंवा मोठी चपाती लाटून वर तीळ भुरभुरावे व लाटण्याने लाटून नंतर वाटीने पुऱ्या पाडून घ्या. तेल तापवून मिडीयम गॅसवर दोन्ही बाजूंनी खरपूस तळून घ्या.

## वास्तू

❋ जर तुमच्या घरात तुळशीचे रोप असेल तर तुम्ही दररोज सकाळी त्याला पाणी द्यावे. रविवार आणि एकादशीला तुळशीला पाणी घालू नये.

❋ धार्मिक मान्यतेनुसार, ज्यांच्या घरात तुळशीचे रोप आहे त्यांनी दररोज संध्याकाळी तुळशीच्या रोपाजवळ दिवा लावावा.

❋ शुक्रवारी तुळशीला दूध अर्पण केल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते.

❋ सर्व प्रकारची इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे दिवाणखान्याच्या अग्नेय दिशेस लावावीत.

## सल्ला

कोणतेही तळण तळताना तेलामध्ये चिमूटभर मीठ टाकावे त्यामुळे पदार्थ जास्त तेल शोषून घेत नाहीत तेलही कमी जळते.

## सौंदर्य

केसांच्या वाढीसाठी वडाच्या झाडाच्या कोवळ्या पारंब्या काढून खोबरेल तेलात कडवून घ्या आणि ते तेल तीन दिवस झाकून ठेवा आणि नंतर कपड्याच्या सहाय्याने गाळून घेऊन केसांच्या मुळाला लावून हलक्या हाताने १५ मिनिटे मालिश करा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १७ ऑक्टोबर २०२५

**रमा एकादशी, वसुबारस, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर,**
**आश्विन कृष्णपक्ष, मघा १३।५८, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** अचानक जुने मित्र भेटतील. कुटुंबातील सदस्यांबरोबर आनंदाचे क्षण अनुभवाल. व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ.

**वृषभ :** स्पर्धात्मक परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाल. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. अधिकारांचा योग्य उपयोग करून घ्याल.

**मिथुन :** जोडीदाराला समजावून घ्याल. तुमचे व्यक्तिमत्त्व आज बहरेल. चिकाटीने कार्यरत राहाल.

**कर्क :** कर्जाऊ रक्कम दिल्याने फसवणूक होईल. व्यवसायात भागीदारी तूर्तास नको. वैवाहिक जीवन चांगले बहरेल. मनावरील दडपण दूर होईल.

**सिंह :** अनावश्यक गोष्टींचा विचार केल्याने मनस्ताप संभवतो. मानसिक बळ वाढेल. नोकरीत अनुकूल स्थिती राहील.

**कन्या :** आरोग्य उत्तम राहील. आर्थिक स्थितीमध्ये बदल घडतील. शारीरिक व्यायामाचे महत्त्व लक्षात घ्याल.

**तूळ :** सहकाऱ्यांशी आपुलकीने वागाल. अति खाणे टाळाल. मागील उधारी वसुल होईल.

**वृश्चिक :** वाहने व उपकरणे जपून वापरावीत. जोडीदाराबरोबर रोमँटिक क्षण अनुभवाल.

**धनु :** धर्म, आध्यात्मात रूचि वाढेल. अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील. भागीदारीतून विशेष लाभ. लोकप्रियतेत वृद्धि होईल.


**मकर :** व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. हितशत्रूंवर मात कराल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल.

**कुंभ :** आर्थिक गुंतवणुकीतून योग्य तो मोबदला मिळेल. स्थावर मालमत्तेत गुंतवणूक कराल.

**मीन :** मानसिक ताण शक्य. कठोर बोलणे वा सहकाऱ्यांशी गैरवर्तणूक महागात पडेल. मैदानी खेळात सहभागी व्हाल. पाठबळ मिळेल. मनाला प्रसन्नता वाटेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. १२०९ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) जितेंद्र, राज बब्बर, अनिता राज, गोविंदा यांचा एक चित्रपट ४) जितेंद्र, लीना चंदावरकर, मदन पुरी यांचा एक चित्रपट ६) देव आनंद, हेमामालिनी यात आहेत ८) ++ कपूर (दिवंगत अभिनेता) ९) अशोककुमार, मीनाकुमारी, प्रदीपकुमार यांचा एक चित्रपट १०) + + पाटेकर (अभिनेता) ११) ++ के साथ साथ घटा के संग संग ओ साथी (गाणे) १३) ++ का मीत (चित्रपटाचे नाव) १५) धर्मेंद्र, लीना चंदावरकर, जगदीप यात आहेत १७) मोहनीश बहल, नगमा, किरणकुमार, शक्ती कपूर, सलमानखान यात आहेत १८) अमीर +++ (चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** १) शशी कपूर, हेमामालिनी, मदन पुरी यात आहेत २) ++ जमाना (चित्रपटाचे नाव) ३) विनोद मेहरा, विद्या सिन्हा यांचा एक चित्रपट ५) अनिल कपूर, विजयाशांती, आशा सचदेव यांचा एक चित्रपट ६) ++ जानी जनार्दन (चित्रपटाचे नाव) ७) राजेश खन्नाच्या प्रारंभीच्या काळातील एक चित्रपट ९) अनिल कपूर, मीनाक्षी शेषाद्री, गोविंदा, अनुपम खेर यांचा एक चित्रपट १२) हा चित्रपट दिलीपकुमारचाही आहे आणि संजय खानचाही आहे १४) अमिताभ, ऋषी कपूर, प्राण, हेमामालिनी यांचा मनमोहन देसाई दिग्दर्शित एक चित्रपट १६) ++ पाहते पुनवेची (चित्रपटाचे नाव)

# ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ मुलांचे विश्व ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** यशाबद्दलची तुमची निष्ठा कणखर असेल तर अपयशामुळे तुम्हाला कधीच नैराश्य येणार नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कॉन्टॅक्ट लेन्सेस घालणे डोळ्यांसाठी चांगले आहे का?

डोळे तुमच्या चेहऱ्याचे खरे हिरो आहेत. जरा विचार करा, तुमचा चेहरा कितीही चांगला असला तरी, जर डोळ्यांमध्ये जीव नसेल तर सर्वकाही निस्तेज दिसेल. म्हणूनच लोक त्यांचा लूक वाढवण्यासाठी चष्म्याऐवजी कॉन्टॅक्ट लेन्स घालणे पसंत करतात. आणि काही लोक फक्त मनोरंजनासाठी किंवा ट्रेंड फॉलो करण्यासाठी त्यांच्या डोळ्यांचा रंग बदलतात. निळा, हिरवा, राखाडी, तुम्हाला जे हवे ते. यामुळे डोळे छान दिसतात.

पण तुम्हाला माहिती आहे का की कॉन्टॅक्ट लेन्स घालणे हा विनोद नाही. ते जितके छान दिसते तितकेच त्याची काळजी देखील तितकीच घ्यावी लागते. थोडीशी निष्काळजीपणा डोळ्यांसाठी धोकादायक ठरू शकते. संसर्ग, जळजळ किंवा इतर कोणतीही समस्या उद्भवू शकते. आणि जर तुम्ही योग्य सराव न करता ते दररोज घातले तर ते तुमच्या दृष्टीवर देखील परिणाम करू शकते.

कॉन्टॅक्ट लेन्स तुमच्या डोळ्यांना हानी पोहोचवू शकतात. डॉक्टर देखील वारंवार सांगतात की स्वच्छता आणि योग्य वापर महत्त्वाचा आहे, अन्यथा कॉन्टॅक्ट लेन्स डोळ्यांसाठी डोकेदुखी बनू शकतात. कॉन्टॅक्ट लेन्स स्वच्छ करण्यात निष्काळजीपणा केल्याने डोळ्यांमध्ये बॅक्टेरिया आणि बुरशी येऊ शकतात. यामुळे जळजळ, वेदना, डोळे लाल होऊ शकतात आणि जर तुम्ही सतत निष्काळजी राहिले तर भविष्यात दृष्टी देखील खराब होऊ शकते.

कॉर्निया हा डोळ्याचा महत्त्वाचा भाग आहे आणि कॉन्टॅक्ट लेन्स त्यावर चिकटतात. जर लेन्स जास्त किंवा चुकीच्या पद्धतीने वापरले गेले तर कॉर्नियामध्ये ओरखडे येऊ शकतात. यानंतर, सर्वकाही अस्पष्ट दिसू लागेल.

कॉन्टॅक्ट लेन्स घातल्यावर डोळे कोरडे होणे सामान्य आहे. याचा अर्थ जळजळ, अंधुक दृष्टी आणि कधीकधी संसर्ग देखील होतो. जर तुम्ही थोडी काळजी घेतली तर तुमचे डोळे ठीक होतील.

कॉन्टॅक्ट लेन्स घालणे ठीक आहे पण निष्काळजीपणा महागात पडू शकतो. सर्वप्रथम, तुमचे लेन्स नेहमी व्यवस्थित स्वच्छ करा. लेन्स लावण्यापूर्वी तुमचे हात स्वच्छ करणे आवश्यक आहे, अन्यथा तुमचे डोळे खराब होऊ शकतात.

प्रत्येक वेळी लेन्स काढताना, ते जुन्या द्रावणात घालू नका. नवीन द्रावण वापरा आणि लेन्स केस स्वच्छ करा अन्यथा संसर्ग होऊ शकतो. हो, लेन्स घालून तासन्तास फिरू नये अन्यथा डोळ्यांना नुकसान होऊ शकते.

## प्रल्हाद अख्यान

ही कथा श्री वसिष्ठांनी श्रीरामांना योगवसिष्ठातील उपशम प्रकरणात सांगितली आहे. उपासनेच्या योगाने देवाची कृपा होऊन ज्ञानसंपन्नता कशी येते, तसेच आत्मज्ञान होण्याला स्वप्रयत्नांची व विचाराची आवश्यकता आहे, असे यावरुन स्पष्ट होते. ती कथा अशी-

पाताळाचा राजा हिरण्यकश्यपू फार उद्दाम झाला, तेव्हा नृसिंहावतार घेऊन विष्णूंनी त्याला मारले. इतर दैत्य घाबरून गेले. भगवान विष्णू परत गेल्यावर प्रल्हादाने दैत्यांचे सांत्वन करून त्यांना बोध दिला. नंतर त्याने विचार केला, देव अतुल पराक्रमी आहेत. त्यांनी माझा पिता व बलाढ्य असुर यांना धुळीस मिळवले. त्यांच्यावर आक्रमण करुन गेलेले वैभव मिळवणे अशक्य आहे. मग आता भक्तीने त्यांना वश केले पाहिजे. 'नमो नारायणाय' असा जप करुन त्याने तपाला सुरवात केली.


हे पाहून सर्व देव आश्चर्यचकित झाले. यात दैत्यांचे काहीतरी गुप्त कारस्थान आहे, असा संशय त्यांनी विष्णूकडे व्यक्त केला. त्यावर विष्णूंनी त्यांना समजावले, बलाढ्य राक्षस माझी भक्ती करून जास्त बलाढ्य होतात हे खरे, पण प्रल्हादाच्या भक्तीमुळे घाबरू नये. त्याचा हा अखेरचा जन्म असून, तो मोक्षार्थी आहे.

प्रल्हादाच्या भक्तीमुळे त्याच्या मनात विवेक, वैराग्य, आनंद या गुणांचा विकास झाला. भोगांबद्दलची आसक्ती संपली. भगवान विष्णू प्रसन्न होऊन 'तू परमपदाला पोचशील' असा वर दिला. ईश्वरदर्शनाने प्रल्हादाचा अहंकार गळाला. तो शांत, सुखी, समाधीस्थित झाला. अशा स्थितीत पुष्कळ काळ लोटला. त्या वेळी दानवांनी त्याला जागृत करण्याचा प्रयत्न केला. दानवांना कोणी शासक राहिला नाही. देवांना असुरांची भीती राहिली नाही. शेषशय्येवर निजलेला श्रीविष्णू जागा झाला तेव्हा मनाने त्याने तिन्ही लोकांची स्थिती अवलोकन केली.

दैत्यांचे सामर्थ्य कमी झाले असून, देव शांत झाले आहेत, त्यांनी दैत्य व मनुष्यांचा द्वेष करणे सोडले आहे. अशा स्थितीत पृथ्वीवरील यज्ञयागादी क्रिया बंद पडतील. भूलोक राहणार नाही, हे त्रिभुवन कल्पांतापर्यंत राहावे या संकल्पाला बाधा येईल. म्हणून दानवांचे राज्य राहिले पाहिजे. त्यासाठी प्रल्हादाला सावध केले पाहिजे. मग श्रीहरी पाताळात जाऊन पोचले. त्यांनी प्रल्हादाला त्याचे राज्य व देह याचे स्मरण दिले.

विष्णूच्या आज्ञेनुसार प्रल्हादाने राज्याभिषेक करवून घेतला. भय, क्रोध, कर्मफळ यापासून विमुक्त होऊन त्याने राज्य केले व शेवटी परमपदाला पोचला. अशा रीतीने स्वप्रयत्नाने त्याने सर्व काही प्राप्त करून घेतले.

## जीवन का अमृत (भाग १)



बहुत धीरे-धीरे, चाहे रुक-रुककर, ताकि आंतरिक दृष्टि में कोई विघ्न न पड़े। दायीं ओर से आती घंटियों की पवित्र आवाज़ की धारा शुभ है और इसे एकाग्रचित होकर सुनना चाहिए। यह नज़दीक आ जाएगी, तीव्र हो जाएगी और अंत में ऊपर से आने लगेगी।

मुझे खुशी है कि आप सतगुरु की दया से जीवन के करीब-करीब हर क्षेत्र में सुधार महसूस करते हैं। यह अवश्य ही आपके द्वारा रोजाना करीब दो घंटे भजन सिमरन करने का फल है। सतगुरु के पवित्र उद्देश्य में सेवा के प्रति आपके प्यार भरे समर्पण की मैं कद्र करता हूँ। फसल बहुत अच्छी हुई

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

है और सतगुरु के अंगूर के बगीचे में काम करने के लिए इच्छुक लोगों की जरूरत है। भजन सिमरन के समय कभी-कभार जो सुनहरी आपने अपनी आत्म निरीक्षण डायरी के बारे में लिखा है कि जब और लोग इस रास्ते पर तरक्की कर रहे हैं, तो आपके साथ ऐसा क्यों नहीं हो रहा है? भजन सिमरन प्रेम और भक्ति का विषय है; इससे हमारे मन की सारी मैल और गंदगी साफ हो जाती है। अशुद्ध विचार, बदले की भावना, ज्ञान का घमंड, वहम करना, प्रभु में अविश्वास कुछ ऐसी बुरी रुकावटें हैं, जो रास्ते में आकर, उसकी दया और आशीर्वाद को हम तक नहीं आने देती हैं। भजन सिमरन यदि सही तरीके से, नियमित रूप से, उचित समय देकर, प्रेम और श्रद्धा के साथ किया जाए तो यह ढेर सारे अच्छे नतीजे देता है। इस रास्ते पर सफलता का रहस्य है अभ्यास, अधिक अभ्यास, और अधिक अभ्यास।

मुझे खुशी है कि आप प्रेम और श्रद्धा के साथ और सतगुरु की दया से पवित्र भजन- सिमरन में समय दे रहें हैं। आप को आंतरिक उन्नति का आशीर्वाद मिला है और आप सिमरन के समय सुनहरी रोशनी देखते हैं।

भजन- सिमरन तीव्र आध्यात्मिक उत्साह के साथ किया जाना चाहिए। इससे और अधिक आंतरिक उन्नति एवं शांति मिलेगी।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

जैसे हमें सुनाई कानो से ही देता है चाहे वह किसी भी दिशा में हो, सुनने का और कोई रास्ता नहीं है। हमें योग में नीद क्यों आती है। नीद का केन्द्र और योग का केन्द्र साथ साथ हैं। शुरु में योग का केन्द्र कच्चा होता है और हम योग लगाते हैं तो यह केन्द्र थोड़ा ऊपर उठता है, जिस से नींद के केन्द्र पर दवाब पड़ता है और हम सो जाते हैं। योग का केन्द्र पक्का हो जाने पर नींद नहीं आती। उड़ान भरते समय राकेट में बहुत शक्तिशाली इंजन लगाया जाता है। यान को कुछ गति देने बाद वह गिर जाता है। फिर कुछ गति के बाद दूसरा इंजन गिर जाता है यान का भार कम हो जाता है। अन्त में विद्युत उर्जा से यान चलता है।

ऐसे ही भगवान को याद करते समय जो तरंग बनती है उसकी तीन परत होती हैं। पहली परत

### आज्ञा चक्र

प्रकृति के पांच तत्वों की बनी होती है जो सूक्ष्म वतन तक जाती है। वहां यह परत खत्म हो जाती है। दूसरी परत सूक्ष्म शरीर के तत्वों की होती है। यह परत सूक्ष्म लोक अर्थात ब्रह्मापुरी, विष्णु पुरी और शंकर पुरी तक जाती है। शंकर पुरी में ये परत खत्म हो जाती है। उसके बाद एक सूक्ष्म तरंग होती है जो आत्मा की एनर्जी अर्थात पवित्रता से बनती है वह परमधाम भगवान के पास पहुँचती है। इस तरंग को न्यूट्रियो कहते हैं। साधना करते समय, अमृत वेले पूर्व दिशा और बाकी समय उत्तर दिशा की ओर मुंह करके बैठने से भगवान से तरंगे प्राप्त करने में सही सुसंगति बन जाती है।

आज्ञा चक्र - २८ -

मन- विचारो की सुगन्ध

दुनिया की प्रत्येक वस्तु जीव वा निर्जीव से सुगंध या दुर्गंध निकलती रहती है। बिल्ली को घर में घुसते ही पता चल जाता है दूध कहां रखा है। उसे पता चल जाता है कि चूहे घर के किस कोने में रहते हैं। ऐसा इसलिये होता है क्योंकि उन से निकल रही सुगंध या दुर्गंध को पहचान जाती है। हमारे अच्छे विचारो से सुगंध निकलती रहती है। प्यार के संकल्पों से ऐसी खुशबु निकलती है जिसका हर कोई दीवाना बन जाता है। हिरण की नाभि में कस्तूरी होती है जिसकी खुशबू बहुत मनमोहक होती है। हिरण उसे ढूंढने के लिये भागता रहता है। ऐसे प्यार व्यक्ति के अपने मन/संकल्पों में होता है जब

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**राम :** माझे बाबा इतके उंच आहेत की उभ्या उभ्या चालता पंखा थांबवू शकतात.

**शाम :** त्यात काय कौतुक आहे? माझे वडील तर त्यांच्यापेक्षाही उंच आहेत पण ते असा अगाऊपणा नाहीत करत

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❋ शौर्य व पद्म पुरस्कारांची घोषणा कधी करण्यात आली?

- २२ जानेवारी २००२

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

मुलांसोबत तेथे बनलेल्या अन्नपदार्थांचा आस्वाद घेतल्यामुळे तुम्हाला तेथील कार्यपद्धती समजेल व मुलांनाही तमच्या उपस्थितीमुळ सुरक्षित वाटेल. सध्याच्या आधुनिक काळात स्त्रीने नोकरीसाठी घराबाहेर पडणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे बाळाला पाळणाघरात ठेवायची वेळ आल्यास नातेवाईक लोक काय म्हणतील, या अपराधी भावनेत जगू नका. मुलांच्या उज्वल भविष्यासाठी व तुमचा स्वतःचा विकास होण्यासाठी मन घट्ट करून काही काळ मूल पाळणाघरात ठेवणे अयोग्य नाही. कारण तुम्ही जर द्विधा मनःस्थितीत जगत राहिलात, तर कामाच्या ठिकाणीही तुम्ही व्यवस्थित न्याय देऊ शकणार नाहीत. त्यामुळे मुल जेथे मी पाळणाघरात ठेवले आहे, तेथे ते आनंदी आणि सुरक्षित आहे,

### पाळणाघर

ही भावना मनामध्ये कायम असू द्या. चांगल्या पाळणाघराचे काही फायदे पण बघायला मिळतात. चांगल्या पाळणाघराच्या संचालिकेकडून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला जातो. तसेच मूल आनंदी व हसरे राहण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. म्हणून मुलाला पाळणाघरात सोडून अगदी मनावर कोणताही ताण, अपराधी भावना न घेता कामावर जावे व घरी आल्यानंतर मुलाला पाळणाघरातून आणल्यावर जास्तीत जास्त वेळ मुलांच्या संपर्कात राहावे. तुम्ही मुलांना किती वेळ देता, यापेक्षा तो वेळ कसा मुलांसोबत घालविता हे जास्त महत्त्वाचे आहे. तुमच्या सान्निध्यात मलांना आपुलकी, प्रेम, सुरक्षितता यांचा अनुभव घेऊ द्या.

शेवटी पाळणाघर ही नोकरी, व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांसाठी पर्यायी सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे गरज असेल तर नक्कीच बालसंगोपन करताना पाळणाघराचा आधार घ्यावा. घरात आई-वडील, आजी-आजोबांच्या सान्निध्यात जे प्रेम, आपुलकी, सुरक्षितता मिळेल तिची सर पाळणाघराला कधीच येऊ शकत नाही. हे सत्य लक्षात असू द्या. म्हणून घरी आल्यावर मुलांना जास्तीत जास्त वेळ द्या.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ॲडव्होकेट डायरी ही जुन्या काळापासून वकिलांची ओळख

**प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे**

नगर – आज डिजिटल युगामध्ये देखील अनेक वकील बंधू भगिनी ॲडव्होकेट डायरीचा वापर करतात त्यामुळे वकिलांसाठी डायरी ही त्यांची ओळख आहे असे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे यांनी म्हटले आहे.



अहमदनगर लॉयर्स को. ऑप. सोसायटीच्या सभासदांकरता सालाबादप्रमाणे यावर्षी देखील सन २०२६ च्या नूतन ॲडव्होकेट डायरीचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

अहमदनगर लॉयर्स को. ऑप. सोसायटीच्या सभासदांकरता सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील सन २०२६ च्या नूतन ॲडव्होकेट डायरीचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून त्या बोलत होत्या.

सेंट्रल बारचे अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी यांनी मनोगत व्यक्त करताना अहमदनगर लॉयर्स को–ऑपरेटिव्ह सोसायटी ही संस्था १९८३ सालापासून अस्तित्वात असून आजतागायत सुरळीतपणे व्यवस्थित कामकाज करत आहे. वकिलांच्या हिताचे निर्णय आणि वकिलांना सुकर व्हावे असे कामकाज करत आहे. संस्था चालवताना अडचणी आणि चढउतार येतात परंतु अडचणींमधूनच मार्ग निघत असतात त्यामुळे विद्यमान संचालक मंडळांनी तळमळीने काम करून अधिकाधिक चांगले काम करावे. विद्यमान संचालक मंडळ करत असलेल्या कामकाजाबाबत ॲड. कोठारी यांनी शुभेच्छा आणि धन्यवाद दिले.

याप्रसंगी जिल्हा सरकारी वकील ॲड. सतीश पाटील, लॉयर्स को–ऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन ॲड. लक्ष्मण कचरे, व्हा. चेअरमन ॲड. संदीप पाखरे, सेक्रेटरी ॲड. विनायक सांगळे, संचालिका ॲड. अनिता दिघे, अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे माजी चेअरमन ॲड. भूषण बऱ्हाटे, माजी व्हा. चेअरमन हाफिज जहागिरदार, संचालिका ॲड. वृषाली तांदळे, संचालक ॲड. रवींद्र शितोळे, ॲड. कुलकर्णी अहमदनगर बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. वैभव आघाव, ज्येष्ठ सदस्य ॲड. अच्युत पिंगळे, ॲड. मुकुंद पाटील, ॲड. मुंदडा, ॲड. रमेश कराळे, ॲड. सतीशचंद्र सुद्रिक, ॲड. सुरेश लगड, ॲड. मुकुंद पाटील, ॲड. अनिल सरोदे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. जरंडीकर मॅडम, ॲड. मुंदडा, ॲड. प्रभाकर शहाणे, ॲड. रफिक बेग यांच्यासह कार्यक्रमास जिल्हा न्यायालयातील वकील उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यमान चेअरमन ॲड. लक्ष्मण कचरे यांनी प्रास्ताविक केले. ॲड. अनिता दिघे आणि ॲड. विनायक सांगळे यांनी सूत्रसंचालन केले. विद्यमान व्हा. चेअरमन संदीप पाखरे यांनी पाहुण्यांचे स्वागत आणि सत्कार केला. ॲड. हाफीज जहागिरदार यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे यांच्या हस्ते अहमदनगर लॉयर्स को–ऑपरेटिव्ह सोसायटी च्या जीव सभासदांना डायरीचे वितरण देखील करण्यात आले.

# नगरमध्ये १९ ऑक्टोबरला 'दिवाळी सांजवेळी' रंगणार



नगर – अहिल्यानगरातील सप्तसूर फाउंडेशन यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दीपावलीच्या शुभ पर्वानिमित्त सुरेल, दर्जेदार आणि अविस्मरणीय गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या वर्षीचा कार्यक्रम दिवाळी सांजवेळी या नावाने १९ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ६ वाजता माऊली संकुल सभागृह, सावेडी येथे रंगणार आहे. या कार्यक्रमात मराठी व हिंदी भाषेतील अनेकविध गाण्यांचा सुरेल मेळ साधण्यात येणार असून युगलगीते, लोकगीते, भावगीते आणि गझल अशा विविध प्रकारच्या गाण्यांचा संगम रसिकांना अनुभवायला मिळणार आहे.

गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने दर्जेदार कार्यक्रम सादर करून सप्तसूर फाउंडेशनने नगरातील संगीतप्रेमींच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. या फाउंडेशनचे वैशिष्ट्य म्हणजे ही सर्व कलाकारमंडळी आपापल्या वैद्यकीय व्यवसायातून वेळ काढून संगीताचा आनंद रसिकांपर्यंत पोहोचवतात. समाजात कलावंत डॉक्टर म्हणून ही मंडळी ओळखली जातात.

यंदा दिवाळीच्या सुट्टीत संध्याकाळी सादर होणाऱ्या या कार्यक्रमामुळे दिवाळीची सांज गीतांनी बहरणार आहे. दिवाळीच्या आनंदोत्सवात सुरेल गाण्यांची फुलझड उडवणारा हा कार्यक्रम रसिकांसाठी पर्वणीच ठरणार आहे. कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून, उपस्थित श्रोत्यांनी वेळेवर येऊन या सुरेल संध्याकाळचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. प्रवेशिकेसाठी डॉ. शिरीष कुलकर्णी :८७८८९६४७९५, डॉ. अविनाश वारे: ९९६००६४५०० व सौ. पल्लवी जोशी : ९४२३७८३०८० यांना संपर्क साधण्याचे म्हटले आहे.



सूरसंगम संगीत प्रस्तुत एन इव्हिनिंग इन अहिल्यानगर–ओल्ड इज गोल्ड माऊली सभागृह येथे नुकताच पार पडला. या मध्ये ६० ते ८० दशकातील हिंदी चित्रपटातील एकल युगल लौकिक गीत नगर मधील कलाकार हेमंत दंडवते, गायिका राधिका अत्रे, सुमित कर्णिक, विनय गुंदेचा, पंढरीनाथ लांडगे यांनी सादरीकरण केले.

## सूरसंगम संगीत प्रस्तुत एन इव्हिनिंग इन अहिल्यानगर कार्यक्रम उत्साहात

नगर – सूरसंगम संगीत प्रस्तुत एन इव्हिनिंग इन अहिल्यानगर–ओल्ड इज गोल्ड माऊली सभागृह येथे नुकताच पार पडला.

या मध्ये ६० ते ८० दशकातील हिंदी चित्रपटातील एकल युगल लौकिक गीत नगर मधील कलाकार हेमंत दंडवते, गायिका राधिका अत्रे, सुमित कर्णिक, विनय गुंदेचा, पंढरीनाथ लांडगे यांनी सादरीकरण केले. निवेदिका प्रणाली क्षीरसागर, गणेश जिंदम यांनी किशोर कुमार यांचे चित्र रेखाटले, व सोनल तरटे यांचे फ्युजन नृत्य सादर केले.

आजी ऐसा मोका फिर कहा, बेचारा दिल क्या करे, ओ मेरी जोहरा जबी, ओ मेरे दिल के चैन, लागा चुनरी हे दाग इ. एक से बडकर एक गीत गायकांनी सुरेल आवाजात सादरीकरण करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमादरम्यान प्रमुख पाहुण्या ग्रीन व्हॅली प्रीस्कूल संस्थापक मुख्याध्यापिका उमंग नंदा, मराठी मालिका अभिनेते मोहिनिराज गटणे, आंतरराष्ट्रीय सुफी गायक पवन नाईक, ज्येष्ठ गायक वाजीद खान यांची विशेष उपस्थितीत कार्यक्रम झाला. प्रायोजकांचे व संगीत कला क्षेत्रात उत्तम कामगिरी करणारे कलावंत सुनील महाजन, उदय जोशी, अजित गुंदेचा, संतोष दीक्षित यांचे सूरसंगम संगीत तर्फे सत्कार करण्यात आले.

सांस्कृतिक, संगीत कला विषयी व नगरच्या जून्या आठवणींवर मनोगत व्यक्त केले. हेमंत दंडवते आणि विनय गुंदेचा यांनी आभार मानले.

# श्रीमंती, सौंदर्य किंवा ओळख या सगळ्यांपेक्षा मोठी बाब म्हणजे 'शिक्षण आणि संस्कार' आहे

**युनुसभाई तांबटकर यांचे प्रतिपादन; ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंतीनिमित्त मखदूम सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनतर्फे मोफत वह्यांचे वाटप**

नगर – अब्दुल कलाम यांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे संघर्ष स्वप्न आणि साध्य यांचं अद्भुत मिश्रण होतं. गरीब कुटुंबातून आलेला मुलगा भारताचा राष्ट्रपती होऊ शकतो, हे त्यांनी दाखवून दिलं. त्यांचं वाक्य आजही प्रेरणा देतं स्वप्न ते नाहीत जी आपण झोपेत पाहतो, स्वप्न ती आहेत जी आपल्याला झोपू देत नाहीत. आज मखदूम सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनतर्फे जे वह्या विद्यार्थ्यांना देण्यात आल्या त्या केवळ वह्या नाहीत, तर त्या ज्ञानाची बियाणी आहेत.त्या प्रत्येक पानावर तुम्ही तुमचं भविष्य लिहू शकता. शिक्षण हे तुमचं सर्वात मोठं शस्त्र आहे. श्रीमंती, सौंदर्य किंवा ओळख या सगळ्यांपेक्षा मोठी गोष्ट म्हणजे शिक्षण आणि संस्कार आहे. तुमच्याकडूनच पुढचं समाजाचं भविष्य घडणार आहे. त्यामुळे अभ्यासाला केवळ गुण मिळवण्यासाठी नव्हे, तर समाजासाठी काही करण्यासाठी करा, असे प्रतिपादन रहमत सुलतान फाऊंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर यांनी केले.



मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दर्गा दायरा मध्ये मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.

मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी राष्ट्रपती, 'भारताचे मिसाइल मॅन' म्हणून ओळखले जाणारे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दर्गा दायरा मध्ये मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी युनूसमाई तांबटकर, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे सहसचिव डॉ.कमर सुरुर, शाळेचे मुख्याध्यापक फैय्याज शेख आदी उपस्थित होते.

डॉ. कमर सुरुर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून प्रेरणादायी विचार मांडले. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व, अभ्यासाची पद्धत आणि डॉ.कलाम यांच्या आयुष्याचा आदर्श कसा घ्यावा याविषयी मार्गदर्शन केले.

शाळेच्या शिक्षिका शेख शाकेरा यांनी प्रास्ताविक करून वर्षभर शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा सादर केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नसीम शेख यांनी तर आभारप्रदर्शन शेख ताहेरा यांनी केले.

# हौशी प्रायोगिक कलावंत संघटनेची स्थापना; अहिल्यानगर शाखेची कार्यकारिणी जाहीर

**अध्यक्षपदी संजय लोळगे, उपाध्यक्ष संदीप येळवंडे, प्रमुख कार्यवाह डॉ. अमित शिंदे, सहकार्यवाह रियाज पठाण तर कोषाध्यक्षपदी सौ. कल्पना नवले**

नगर – राज्यातील रंगकर्मी, नाट्यप्रेमी आणि नवोदित कलावंतांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, कलावंतांचे प्रश्न शासन दरबारी मांडून त्याची सोडवणूक करणे या उद्देशाने नुकतीच हौशी प्रायोगिक कलावंतांची राज्यस्तरीय संघटना स्थापन करण्यात आली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांतील हौशी कलाकारांना या संघटनेत सभासदत्व देण्यात आले आहे.

संघटनेची मध्यवर्ती सभा अलीकडेच उत्साहात पार पडली. या सभेमध्ये अहिल्यानगर शाखा स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून, यासंदर्भाचे अधिकृत पत्र मध्यवर्तीचे अध्यक्ष सलीम शेख यांच्या स्वाक्षरीसह प्राप्त झाले आहे. यानंतर अहिल्यानगरमधील सभासदांनी एकत्र येऊन स्थानिक शाखेची सभा घेतली. या सभेत सर्वानुमते अहिल्यानगर शाखेची कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

या कार्यकारिणीमध्ये – अध्यक्ष संजय लोळगे, उपाध्यक्ष संदीप येळवंडे, प्रमुख कार्यवाह डॉ. अमित शिंदे, सहकार्यवाह रियाज पठाण, कोषाध्यक्ष सौ. कल्पना नवले, प्रसिद्धी प्रमुख डॉ. मयूर तिरमखे, संघटक नाना मोरे, मार्गदर्शक सतीश लोटके, कार्यकारिणी सदस्य शुभम घोडके, प्रशांत सूर्यवंशी, तेजस अतीतकर, विनोद वाघमारे आणि गणेश लिमकर यांची निवड करण्यात आली आहे.

मध्यवर्तीचे नियामक मंडळ सदस्य नानाभाऊ मोरे यांनी कार्यकारिणीची घोषणा केली.

या प्रसंगी मध्यवर्तीचे संघटक सतीश लोटके यांनी संघटनेचे ध्येय व उद्दिष्टे स्पष्ट करताना सांगितले की, ही संघटना केवळ रंगमंचावरच नव्हे तर कलाकारांच्या जीवनातील अडचणी सोडवण्यासाठी, त्यांच्या हक्कांसाठी आणि नव्या संधी निर्माण करण्यासाठी कार्यरत राहील.

संजय लोळगे यांनी या वेळी भावना व्यक्त करताना सांगितले, अहिल्यानगरमधील हौशी कलावंतांना व्यासपीठ देणे, त्यांच्या कलागुणांना चालना देणे आणि रंगभूमीवरील अडचणी दूर करणे हे आमचे प्रमुख ध्येय आहे. लवकरच नाट्यप्रशिक्षण, कार्यशाळा आयोजित करून कलाक्षेत्रात नवा उत्साह निर्माण करू.

या सभेला विजय साळवे, सुशांत थोरात, प्रसाद भणगे, महादेव गाडे, किरण खेडकर, सिद्धी कुलकर्णी, अनंत जोशी, मोनीश डहाळे, अविनाश कराळे, प्रा. रवींद्र काळे, समीर कुलकर्णी, राहुल रसाळ आदींची उपस्थिती लाभली.

# नगर येथील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अनवरअली सय्यद सुवर्णपदकाचे मानकरी

नगर – गुजरात राज्यातील सूरत येथील वीर नर्मदा युनिव्हर्सिटीत १ जानेवारी ते १२ ऑक्टोबर २०२५ दरम्यान नॅशनल वेटरनस मास्टर गेम्स स्पर्धा पार पडल्या.

**पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते सन्मान**




नॅशनल वेटरनस मास्टर गेम्स स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अनवरअली सय्यद यांनी धावण्याच्या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक मिळवल्याबद्दल पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी त्यांचा सत्कार करून कौतुक केले. (छाया – बबलू शेख)

या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अनवरअली सय्यद यांनी वय वर्षे गट ५५ मध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत सहभाग घेतला, त्यांनी ४X१०० मीटर रिले धावण्याच्या प्रकारात उत्कष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्ण पदक मिळवले, त्यांच्या या यशस्वी कामगिरीमुळे पोलीस दलाचा गौरव वाढवला

या यशाबहल अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी त्यांचा सत्कार करून कौतक केले. तसेच पोलीस उपाधीक्षक (गृह), जगदीश भांबड, पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, राखी पोलीस उपनिरीक्षक विजय भोसले आणि प्रशिक्षकवर्ग मुसा सर, आयुब सर, खलील सर, मोरे सर, खेडकर सर, मंगेश दाभाडे, अंजली बर्डे, शाहनवाज सर, अर्चना काळे, विक्टर जोसेफ यांचे मार्गदर्शन लाभले.

# सहकार, सामाजिक क्षेत्रात स्पृहणीय योगदान

***नगर शहर व जिल्ह्याला समाज धुरिणांची मोठी परंपरा आहे. संपूर्ण देशाला सहकाराचा मूलमंत्र नगरनेच दिला. या क्षेत्रातील दिग्गजांच्या मांदियाळीतील एक नाव म्हणजे सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा उर्फ भाऊ. सुवालालजी गुंदेचा हे सहकारमहर्षी, समाजभूषण म्हणून ओळखले जायचे. सहकारी आर्थिक संस्थांमध्ये विश्वस्त भावनेने काम करून समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी योगदान कसे द्यायचे असते याचा आदर्श त्यांनी निर्माण केला. त्यांच्या सातव्या स्मृतीदिनी (दि.१६ ऑक्टोबर) त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा लेख...***



सुवालालजी गुंदेचा

सहकारमहर्षी सुवालाल गुंदेचा उर्फ सर्वांचे आदरणीय भाऊ म्हणजे नगर शहर तसेच जिल्ह्यातील सहकारी बँकींग क्षेत्राचे चालताबोलते विद्यापीठ होते. शतकोत्तर परंपरा असलेल्या नगर अर्बन बँकेचे चेअरमनपद, संचालकपद भूषविताना त्यांनी बँकेला एका वेगळ्याच उंचीवर नेवून ठेवले. बॅकिंग क्षेत्रात योगदान देताना त्यांनी भविष्याचा वेध घेत सर्वच सहकारी बँकांना एकत्र आणत अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनची स्थापना केली. नवी दिल्ली येथील नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को ऑप.बँक्स ॲण्ड क्रेडिट सोसायटीचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली. महाराष्ट्र अर्बन को ऑप.बँक्स फेडरेशनचेही अध्यक्षपद तसेच संचालकपद त्यांनी भूषविले. जैन ओसवाल पंचायत सभेचे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते.

दोन दशकांपूर्वी त्यांनी सर्वसामान्यांना आर्थिक पत देण्यासाठी तसेच रोजगार निर्मिती, व्यवसायांना चालना मिळण्यासाठी जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली. सुरूवातीपासून त्यांनी कडक शिस्त आणि पारदर्शक कारभारावर भर दिला आपण संस्थेचे मालक नाही तर विश्वस्त आहोत, सभासदांचा विश्वास कायम जपला पाहिजे असे त्यांनी सर्व सहकाऱ्यांच्या मनावर बिंबवले. कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देताना त्यांनी शिस्तबद्ध कारभार महत्वाचा मानला. भाऊंची पतसंस्था म्हणजे विश्वास, सचोटी असा नावलौकिक अल्पावधीतच प्राप्त झाला. आमच्या सारख्या तरूणांना त्यांची कार्यपद्धती जवळून पाहता आली. सहकारी बँकींगचा त्यांचा दांडगा अभ्यास थक्क करणारा व प्रेरणा देणारा आहे. आज भाऊंनी पाहिलेले संस्थेच्या स्वमालकीच्या देखण्या व भव्य ईमारतीचे स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले.

विविध संस्थांचे पदे भूषवीताना त्यांनी प्रत्येक पदावर काम करताना त्यांनी ठसा उमटविणारे काम केले. प्रदीर्घ अनुभव, सखोल अभ्यास या जोरावर त्यांनी ते काम करीत असलेल्या संस्थांची प्रगतीच साधली. त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा आदरयुक्त दरारा कायम जाणवायचा. पण प्रत्यक्षात ते अतिशय प्रेमळ व कुटुंबवत्सल होते. चुकीच्या गोष्टींबद्दल त्यांना चीड असायची. अशा गोष्टी ते स्पष्टपणे बोलून दाखवायचे. त्यामुळे त्यांच्या सान्निध्यात असताना कायम दक्ष रहावे लागायचे. त्यांनी बिंबवलेली शिस्त आजही कायम आहे. सामाजिक क्षेत्रातील त्यांचा प्रवास त्यांना अनेक संस्थांशी जोडणारा ठरला. अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. बी.एस्सीची पदवी घेतलेल्या भाऊंना शिक्षण क्षेत्रातही रस होता. रयत शिक्षण संस्थेच्या शिक्षण प्रसाराच्या कार्यात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. बीड जिल्ह्यातील कडा येथील अमोलक जैन विद्यालयाचे ते माजी अध्यक्ष होते. नगरमधील रेल्वे सल्लागार समिती, अहमदनगर शहर शांतता कमिटीवर सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. लायन्स क्लब ऑफ नागापूर एमआयडीसीचे ते संस्थापक अध्यक्ष होते. त्यांची शिकवण कायम दीपस्तंभासारखी दिशादर्शक आहे. त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र श्रद्धांजली!

– **संतोष गांधी,** माजी चेअरमन व विद्यमान संचालक सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्था

# नगर शहरात दर्जेदारपणा व गुणवत्तेची ११५ वर्षांची परंपरा : बंबईवाला हलवाई

Since 1910
बम्बईवाला
मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीटस् । नमकीन । ड्रायफ्रुट । दिल्ली चाट । फास्टफुड

नगरमध्ये स्वातंत्र्यत्तोपूर्व काळात सन १९१० मध्ये स्थापन झालेल्या बम्बईवाला हलवाई या दालनात तोच स्वाद, तीच गुणवत्ता कायम राखत नगरसह राज्यातील खवय्यांच्या जीभेवर अधिराज्य गाजवले आहे. सर्वोत्कृष्ट बासुंदीसाठी प्रसिध्द असलेल्या बम्बईवालाचे सर्वच स्वीटस दर्जेदारपणा, गुणवत्ता आणि हायजीनसाठी नावाजली जातात. यंदाच्या दिवाळीतही सर्व प्रकारच्या मिठाई, नमकीनसह बकलावा अरेबियन स्वीट, ड्रायफूट बॉक्स, ड्रायफ्रूट बाईटसही उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याशिवाय खास बम्बईवाला यांचे नमकीन्स दिवाळी फराळाचा आस्वाद अधिक कुरकुरीत करणारी आहेत, अशी माहिती जगदीश झालानी यांनी दिली.

नगरच्या कापडबाजारात रघुनाथजी झालानी, श्रीनारायणजी झालानी, दामोदरजी झालानी या तिघा बंधूंनी बम्बईवाला नावाने मिठाईचे दुकान सुरु केले. सुरवातीला दूग्धजन्य पदार्थांपासून मलई बर्फी, बासुंदी तयार करण्यात असे. या दोन्ही मिठाईंचा स्वाद अल्पावधीतच ग्राहकांच्या जीभेवर रेंगाळला. नगरमध्ये कोणाकडे पाहुणे आले की त्यांच्यासाठी बम्बईवाला येथून बासुंदी मागावली जायची. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू स्वातंत्र्य चळवळीत काही काळ नगरला भुईकोट किल्ल्यात बंदिवान होते. त्यांच्यासाठी नियमितपणे बम्बईवाला यांची खास बासुंदी पाठवली जायची. पंडित नेहरू सुध्दा या बासुंदीचे चाहते बनले होते. दालनाची हिच खासियत पुढे नेण्याचे काम पुढील काळात राधेशाम, रामधन व रूपनारायण झालानी या तिघा बंधुंनी केली. आज जगदीश झालानी यांच्या रूपाने तिसरी पिढी व चौथी पिढी नमन झालानी हे बम्बईवाला दालनाचा कारभार पाहत आहे.

बम्बईवाला मिठाईचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे मिठाईसाठी लागणारा खवा, मावा बाहेरून मागवला जात नाही. उच्च प्रतीचे दुध खरेदी करून त्यापासून खवा, मावा तयार केला जातो. त्यापासूनच मिठाई तयार केली जाते. ग्राहकांचा कल लक्षात घेवून मिठाईत साखर योग्य प्रमाणात टाकली जाते. याशिवाय मधुमेह ग्रस्तांसाठी शुगर फ्री मिठाई सुध्दा उपलब्ध आहे. ग्राहकांना सर्वोत्तम चव, गुणवत्तेची हमी याठिकाणी मिळते. यामुळे पिढ्यानपिढ्याचे ग्राहक बम्बईवालाशी जोडले गेलेले आहेत. नगरसह महाराष्ट्रातील ग्राहक नगरला आल्यावर येथील मिठाई व नमकीन आवर्जून खरेदी करतात. दिवाळीनिमित्त खास स्वादाचे फराळाचे पदार्थ याठिकाणी उपलब्ध असतात. शुध्द तूपातील अनारसे, करंजी, ड्रायफ्रुट करंजी, स्पेशल भाजणीची चकली यांना विशेष मागणी असते.

शुध्द गुणवत्तेची मिठाईसह रूचकर नमकीनचे विविध प्रकार ग्राहकांच्या पसंतीस उतरणारे आहेत. दिवाळी निमित्त आकर्षक पॅकेजिंग असेलेल्या मिठाई, नमकीन्स, दिवाळी फराळ, मिक्स मिठाई मागणीप्रमाणे उपलब्ध करून दिली जाते. जवळपास ११५ वर्षांपासून ग्राहकांमध्ये बासुंदी, मिठाई म्हटले की बम्बईवाला हे समीकरण रुढ झालेले आहे. यंदाही हे दालन सर्वोत्कृष्ट स्वाद सेवेसाठी ग्राहक सेवेसाठी एम जी रोड कापड बाजार व बुरुडगाव रोड चाणक्य चौकात सज्ज आहे.

– **जगदीश झालानी**

# अहिल्यानगर महापालिकेच्या गणेशोत्सव देखावे स्पर्धा २०२५ मध्ये बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठान ट्रस्टच्या जिवंत देखाव्याला प्रथम क्रमांक

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या गणेशोत्सव देखावे स्पर्धा २०२५ मध्ये बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठान ट्रस्टने जिवंत देखावा/सोशल मिडिया व आधुनिक तंत्रज्ञान या श्रेणीतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. मंडळाच्या वतीने महाअवतार नृसिंहस्वामी हा जिवंत देखावा साकारण्यात आला होता.


अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या गणेशोत्सव देखावे स्पर्धा २०२५ मध्ये बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठान ट्रस्टने जिवंत देखावा/सोशल मिडिया व आधुनिक तंत्रज्ञान या श्रेणीतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.

महापालिकेच्या सभागृहात झालेल्या या समारंभात मनपा सहा. आयुक्त श्रीमती सपना वसावा यांच्या हस्ते बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठान (ट्रस्ट)चे संस्थापक अध्यक्ष दिलदारसिंग बीर, उपाध्यक्ष किरण डफळ, कार्याध्यक्ष अजय दराडे, सचिव कुणाल गोसके आणि खजिनदार वरुण मिस्कीन यांना सन्मानचिन्ह व पारितोषिक प्रदान करण्यात आले. यावेळी मंडळाचे गणेश म्याना, राजु गड्डम, महेश सब्बन, जिग्नेश जग्गड, राजु पठारे, दत्ता बेत्ती, संजय कांबळे, सुमित गोसके, मयुर चिलवर, प्रथमेश संभार, रोहित म्याना, सुरज गोंधळी, संकेत जक्कल, सर्वेश सब्बन, प्रथम सिंग आदींसह शहरातील गणेशभक्त आणि विविध मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

दिलदारसिंग बीर म्हणाले की, दरवर्षी बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठान ट्रस्ट गणेशोत्सवात धार्मिक, सामाजिक आणि जनजागृतीवर देखावे सादर करत असतो. यावर्षी महाअवतार नृसिंहस्वामी या जिवंत देखाव्याला गणेश भक्तांचा उदंड प्रतिसाद लाभला. त्याची दखल महापालिकेने घेऊन मंडळास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक दिल्याचा सर्वांना आनंद होत आहे. मंडळाच्या वतीने वर्षभर धार्मिक व सामाजिक उपक्रम सातत्याने सुरु असतात. मंडळाच्या माध्यमातून मोठा युवा वर्ग जोडला गेला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या स्पर्धेचे परीक्षण मेहेर लहारे, प्र. मुख्य लेखाधिकारी गणेश लयचेट्टी, प्रसिध्दी व संस्कृतिक विभाग प्रमुख शशिकांत नजन, क्रीडा विभाग प्रमुख व्हिन्सेंट फिलिप्स, परीक्षक श्रेणिक शिंगवी, संदीप जाधव, ठाकुरदास परदेशी, तेजस अतितकर यांनी केले.

या देखाव्यासाठी ऑरा डान्स ॲकॅडमीचे सागर जाधव, प्रणव लोखंडे, प्रेम उदमले, पृथ्वी धुमाळ यांचे सहकार्य लाभले. मंडळाने या यशाबद्दल सर्व देणगीदार, भाविक भक्त, मार्गदर्शक, सभासद व मित्रपरिवाराचे आभार मानले असून, पुढील वर्षी आणखी भव्य आणि तंत्रज्ञानाधारित देखावा सादर करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# भारतीय जनता पार्टीला अभिप्रेत असे कार्य सावेडी मंडलाकडून सुरु असल्याचे समाधान

## प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे प्रतिपादन; पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी निधी संकलन

नगर – भाजपाला अभिप्रेत असणारे कार्य सीए ज्ञानेश्वर काळे यांच्या नेतृत्वात सावेडी मंडलाकडून सुरू असल्याने समाधान वाटते असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केले. सावेडी मंडलाने अतिवृष्टीने बाधित झालेल्या पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी निधी संकलन कार्यकर्ते, काही दानशूर व्यक्ती यांच्याकडून स्वइच्छेने जमा करून ते मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दिले. त्यावेळेस ते बोलत होते. यावेळी मंडलाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे, उपाध्यक्ष संदीप कुलकर्णी, साहिल मुळे, सुयोग भोर इ. उपस्थित होते.


सावेडी मंडलाने अतिवृष्टीने बाधित झालेल्या पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी निधी संकलन कार्यकर्ते, दानशूर व्यक्तींकडून स्वइच्छेने जमा करून ते मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दिले.

यावेळी ते म्हणाले, आज मला हे सांगताना अत्यंत आनंद होत आहे की, माझे मित्र सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांनी संपूर्ण महाराष्ट्राला एका वेगळ्या पद्धतीने आणि महाराष्ट्रातील संकटात असणारे शेतकरी अशा विषयामध्ये फक्त गप्पा न मारता त्यांनी स्वतः व मंडलाच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या भागामधील असणाऱ्या भाजपाच्या कार्यकर्त्यांकडे तसेच काही दानशूर व्यक्तींकडे जाऊन सर्वांकडून जेवढी जमेल तेवढी मदत आपण शेतकऱ्यांना करावी अशी विनंती त्यांनी व सावेडी मंडलाच्या कार्यकर्त्यांनी केली. अशी विनंती केल्यानंतर कुणी ५०० रु., तर कुणी १,००० रु. अशी रक्कम चेकने एकत्रित केली, सर्व रक्कम चेकद्वारेच जमा केली आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रु.१,०१,००० चे सर्व चेक माझ्याकडे सुपूर्त केले. असे कार्य करणारे कार्यकर्ते फार कमी असतात, त्यामुळे मला सावेडी मंडलाचा अभिमान वाटतो.


प्रदूषण मुक्त दिवाळीतून मदतीचा संदेश देणारे अरणगाव मधील संस्कार अकॅडमीचे चिमुकले विद्यार्थी.

# अरणगावमधील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी प्रदूषणमुक्त दिवाळीतून दिला मदतीचा संदेश

नगर – अरणगाव, मेहराबाद येथील संस्कार अकॅडमीच्या संस्कार क्लासेस व प्ले ग्रुप व नर्सरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करण्याचा संदेश देत अनाम प्रेम या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध फराळाचे पदार्थ, शैक्षणिक साहित्य ड्रेस इत्यादी वस्तू भेट दिली. यानिमित्ताने अनाम प्रेम संस्थेच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या हस्ते दिवाळी अंकाचे प्रकाशनही करण्यात आले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक त्याचप्रमाणे अनाम प्रेम संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी सर्वांचे स्वागत व आभार संचालिका सौ. प्राध्यापिका अमृता अमोल देवकर यांनी मानले.

# 'भारतीय इतिहासामध्ये आदिवासी समुदायाचे योगदान' या विषयावर सातारा संशोधन मंडळाची राधाबाई काळे महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद

नगर – राधाबाई काळे महिला महाविद्यालयात 'भारतीय इतिहासामध्ये आदिवासी समुदायाचे योगदान' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली.


राधाबाई काळे महिला महाविद्यालयात 'भारतीय इतिहासामध्ये आदिवासी समुदायाचे योगदान' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना अनिल साळुंखे आदी.

इतिहास विभाग आय.क्यू.ए.सी व सातारा इतिहास संशोधन मंडळ सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद घेण्यात आली. इतिहास संशोधनात आदिवासींच्या कार्याचे योगदान महत्त्वाचे आहे म्हणून आदिवासींच्या संशोधकार्यासाठी स्वतंत्र प्रादेशिक मंडळे स्थापन व्हायला हवीत असे प्रो.डॉ.लहु गायकवाड यांनी आपल्या बीज भाषणातून विचार व्यक्त केले. इतिहासाव्यतिरिक्त इतर प्राध्यापकांनी तसेच संशोधकांनीही इतिहास संशोधनात रस दाखववा असे प्रतिपादन त्यांनी केले.

परिषदेचे उद्घाटक अनिल साळुंखे रयत शिक्षण संस्था सातारा जनरल बॉडी सदस्य यांनी संस्थेच्या माध्यमातून दूर्लक्षित आदिवासी घटकांसाठी केलेल्या कार्याचा उल्लेख करून सातारा इतिहास संशोधन मंडळ कर्मवीरांचा हा वारसा पुढे चालवत असल्याचा निर्वाळा देऊन त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

सातारा इतिहास संशोधन मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी स्वातंत्र्य चळवळीतील आदिवासींच्या बहुविध कार्याचा उल्लेख करून आदिवासींच्या इतिहासाचा नव्याने धांडोळा घेण्याची गरज व्यक्त केली. तसेच सातारा इतिहास संशोधन मंडळ हे साताऱ्यापुरते मार्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रभर व महाराष्ट्राच्या बाहेरही त्याचा प्रसार व्हावा व अभ्यासू संशोधक निर्माण व्हावेत असा विचार व्यक्त केला.

इतिहासामधील सखोल संशोधनासाठी सातारा इतिहास संशोधन मंडळा तर्फे दिला जाणारा 'राजर्षी छत्रपती शाहू इतिहास संशोधक व लेखक पुरस्कार २०२५' हा मुंबई विद्यापीठातील इतिहास विषयाचे अभ्यासक प्रो.डॉ.नारायण भोसले यांना प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, मानपत्र व ५००० रु रोख रक्कम असे होते. मनोगत व्यक्त करताना भोसले यांनी 'भारतीय संस्कृतीचा इतिहास आदिम संस्कृतीशी जोडला गेल्याचे स्पष्ट केले, व भाषेच्या अभ्यासाशिवाय इतिहासाचा अभ्यास शक्य नाही अशी सडेतोड भूमिका मांडली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य शंकर थोपटे यांनी आदिवासींचा गौरवशाली इतिहास अभ्यासने गरजेचे आहे' असे मनोगतातून सांगीतले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य शंकर थोपटे, उपप्राचार्य डॉ.भूपेंद्र निकाळजे, डॉ. गणेश विधाटे, डॉ. सतिष सायकर, डॉ.एम.आर. खान, डॉ. मुबारक शेख, प्रा.विष्णु अडसरे, प्रा.विलास एलके, प्रा.अमोल बुचुडे, डॉ.सचिन कोतकर, प्रा.रोहिणी शेळके, डॉ. अंजली खिलारी, अंबादास गोरे, प्रशांत रोहकले, प्रा.अनुप शिंदे, प्रा. वर्षा वाकडे, अर्जून जायभाय यांनी सहकार्य केले.

समारोपाच्या सत्रात प्रमुख अतिथी प्रो. डॉ.जगदिश सोनवणे (संत ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा) होते. त्यांनी भटक्या विमुक्तांच्या व्यथा वेदना दुर्लक्षित करून चालणार नाही त्याकडे शासनाचे अभ्यासकांचे लक्ष वेधले पाहिजे असे सांगीतले.

अध्यक्ष प्राचार्य विजयराव नलावडे यांनी आतापर्यंतच्या १५ अधिवेशनांची वाटचाल स्पष्ट करून सोळावे अधिवेशन कसे संस्मरणीय ठरले आहे ते स्पष्ट केले.

कार्यक्रमाला विविध विद्यापीठातून उपस्थित होते. महाविद्यालयातूनही प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थीनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रथम व द्रितीय सत्राचे आभार अनुक्रमे डॉ. जयपाल सावंत व डॉ. संजीव बोडखे यांनी मानले. सुत्रसंचालन डॉ.शुभांगी ठुबे, डॉ. शुभांगी दांगट, प्रा. गितांजली खाडे यांनी केले.

# ज्ञानप्रेम विजयजी व हितप्रेम विजयजी महाराज यांचा कापड बाजार जैन मंदिरात २०२६ ला चातुर्मास

नगर – अहिल्यानगर येथील कापडबाजार श्री संभवनाथ भगवान जैन मंदिरात पुढील वर्षी २०२६ मध्ये चातुर्मासाठी आचार्य भगवंत श्री हेमचंद्र सुरीश्वरजी महाराजा साहेब यांचे शिष्य प्रखर वक्ता ज्ञानप्रेम विजयजी महाराज व हितप्रेम विजयची महाराज (सांसारिक जीवनातील पितापुत्र) अशा २ ठाण्याचा चातुर्मास होणार आहे. नाशिक येथे महाराजांनी या अहिल्यानगर येथील चातुर्मासाची जय बोलली (होकार दिला आहे) आहे. त्यामुळे संघात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे, अशी माहिती कापड बाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा व ट्रस्टी मंडळाने दिली आहे. तसेच सकल संघासाठी खूशखबर आहे की, श्री संभवनाथ भगवान मंदिर कापडबाजार व श्री आदेश्वर भगवान मंदिर, गुजर गल्ली या दोन्ही मंदिरात धनतेरेस ते भाऊबीज या कालावधीत सहा दिवस राजस्थान येथील अंगी कारागीर वेगवेगळ्या व विशेष प्रकारच्या मनमोहक अंग्या (अंगरचना)करणार आहेत. सर्वांनी या कालावधीत दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा व सर्व ट्रस्टी मंडळाने केली आहे.

# वाचन प्रेरणा दिन आणि ग्लोबल हॅण्ड वॉश डे उत्साहात साजरा

## महाराष्ट्र पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज येथे विद्यार्थ्यांचा सहभाग

नगर – महाराष्ट्र पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, सावेडी अहिल्यानगर येथे १५ ऑक्टोबर रोजी 'वाचन प्रेरणा दिन' आणि 'ग्लोबल हॅण्ड वॉश डे' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या अध्यक्षा सौ. स्वाती दराडे, प्राचार्य अंकूश दराडे, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. हेमा कोंगे आणि समन्वयक प्रणव दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



महाराष्ट्र शासनाने डॉ. कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर हा दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून घोषित केला आहे. भारताचे माजी राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन ऑफ इंडिया डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवास, कार्य आणि विचारांची ओळख करून देण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी कलाम यांच्या पुस्तकांचे वाचन केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड आणि ज्ञानाची ओढ निर्माण झाली.

वाचन ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाची किल्ली आहे. डॉ. कलाम यांच्या वाचन प्रेमातून प्रत्येक विद्यार्थ्याने प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन संस्थेच्या अध्यक्षा सौ. स्वाती दराडे व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. हेमा कोंगे यांनी केले. तसेच याच दिवशी साजरा करण्यात आलेला 'ग्लोबल हॅण्ड वॉश डे' विद्यार्थ्यांसाठी आरोग्यविषयक जागृतीचा अनोखा अनुभव ठरला. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) २००८ पासून या दिवसाची सुरुवात केली असून, त्यामागचा उद्देश रोगांपासून बचावासाठी हात स्वच्छ ठेवण्याची सवय लावणे हा आहे. विद्यार्थ्यांनी हात धुवा, आजार टाळा, आरोग्य सांभाळा! या घोषवाक्याखाली साबणाने हात धुण्याचे प्रात्यक्षिक सादर केले आणि स्वच्छतेची शपथ घेतली. या संयुक्त उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा आणि स्वच्छतेचे भान दोन्ही विकसित करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास, विद्यार्थी आणि शिक्षकवृंद यांची उपस्थिती लाभली.

# डोनियर इंडस्ट्रिजच्या डी' कॉट' दालनाचा शुभारंभ

नगर – डोनियर इंडस्ट्रिज लिमिटेडच्या डी' कॉट या ब्रॅण्डच्या नाशिक येथे नवीन जागेत सुरू करण्यात आलेल्या दालनाचा शुभारंभ ग्रुपचे चेअरमन अजय अगरवाल व उमेद ग्रुपचे प्रमोद बिहाणी यांच्या हस्ते फित कापून झाला. यावेळी डी'कॉटचे व्हा. प्रेसिडेंट आकाश मनवाणी, नाशिक डी'कॉटचे संचालक महेश बिहाणी, संजय सारडा, सुदर्शन सारडा आदी उपस्थित होते.


डोनियर इंडस्ट्रिज लिमिटेडच्या डी' कॉट या ब्रॅण्डच्या दालनाचा शुभारंभ करताना अजय अगरवाल आदी.

महेश बिहाणी म्हणाले, नाशिक बरोबरच नगर येथील डी'कॉटच्या दालनात खास दिवाळी–पाडव्यानिमित्त विविध ऑफर्स उपलब्ध आहेत. नवीन स्टॉक व नवनवीन व्हरायटी खरेदीचा ग्राहकांना चांगली संधी असून, ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. दालनाच्या वतीने दिवाळीनिमित्त आकर्षक ऑफर्स उपलब्ध करून देण्यात आल्या असून, संपूर्ण नवीन व फ्रेश स्टॉक उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा

नगर – के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात आकर्षक ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला प्रतिसाद देत विविध पुस्तकांचे अवलोकन केले. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत व प्रमुख पाहुणे प्रा. ऋषिकेश शिंदे यांच्या हस्ते डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

प्रमुख अतिथी प्रा. ऋषिकेश शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात सांगितले की, वाचन माणसाला विचार करायला शिकवते. पुस्तकांशी मैत्री केली तर व्यक्तिमत्व घडते. महान व्यक्तींनी वाचनाच्या बळावरच आपल्या कार्याची उंच शिखरे गाठली, असे मत व्यक्त केले.

महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी विद्यार्थ्यांना डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याची प्रेरणादायी माहिती देत वाचन ही केवळ सवय नसून व्यक्तिमत्व विकासाचा भक्कम पाया आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज किमान ३० मिनिटे पुस्तक वाचनाची सवय लावावी, असे आवाहन केले.

ग्रंथपाल सौ. हर्षाली रासकर यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा. सविता चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. वर्षा कीर्तने यांनी केले. या प्रसंगी प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. आरती खेडकर, विद्यार्थी उपस्थित होते.


के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



आर्किटेक्ट इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असो.तर्फे संस्था सभासदांसाठी दांडिया व गरबा नाइट हा फॅमिली एंटरटेनमेंटचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. (छाया – लहू दळवी)

# रूढी, परंपरा यांचे जतन करण्यासाठी दांडिया, कोजागिरी उत्सव साजरे करावे

## एसा अध्यक्ष अभिजित देवी यांचे प्रतिपादन; आर्किटेक्ट इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोच्या वतीने सभासदांसाठी 'दांडिया व गरबा नाइट' फॅमिली एंटरटेनमेंट कार्यक्रम

नगर – रूढी, परंपरा यांचे जतन करण्यासाठी दांडिया, कोजागिरी उत्सव साजरे करावे, आर्किटेक्ट अथवा इंजिनीअर्सचे काम करताना कुटुंबीयांना वेळ देता येत नाही त्यामुळे अश्या उपक्रमाच्या माध्यामातून सर्व सभासद एकत्र येऊन आनंद साजरा करतात. त्याचबरोबर विविध मटेरियल सप्ल्यायर्स, इतर बांधकाम मटेरियल विक्रेते प्रतिनिधी आणि स्टील कंपनी वितरक यांच्यामधील संबंध दृढ होतात. असे प्रतिपादन एसा संस्था अध्यक्ष अभिजित देवी यांनी केले.

आर्किटेक्ट इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असो. ने संस्था सभासदांसाठी दांडिया व गरबा नाइट हा फॅमिली एंटरटेनमेंटचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव, सुनिल औटी, संतोष खांडेकर, गौरव मांडगे, संजय चांडवले, सुनिल जाधव, संकेत पादिर, आदिनाथ दहिफळे, सचिन डागा, जितेश सचदेव, अनमोल जैन आणि सभासद उपस्थित होते.

एस आर जे स्टीलचे अनिरुद्ध पांडे यांनी अशा उपक्रमातून सभासदांशी संबंध दृढ होऊन आमची उत्पादने आणि सर्व्हिस याबाबत योग्य अभिप्राय मिळून त्यात सुधारणा करण्यास चालना मिळते तसेच नवीन संकल्पना विकसित होण्यास मदत होते असे नमूद केले.

सूत्रसंचालन आर. जे प्रसन्न पाठक यांनी केले. यावेळी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले तसेच त्यातील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देण्यात आले. स्पर्धेतील विजेते खालील प्रमाणे बेस्ट किड्स डान्स राजवी मुळे आणि हिर सचदेव, बेस्ट सोलो डान्स कोमल कुलकर्णी लेडीज मध्ये तर उदित हिरे जेंट्स मध्ये, बेस्ट कपल डान्स श्री व सौ. प्रसन्न साळुंके आणि श्री व सौ. रोहित लुनिया यांना बक्षिस देण्यात आले. बेस्ट ड्रेस अप साठी चेतना मुथीयान, शिवानी पादिर, सिद्धी सप्रे व निकिता बालटे यांची निवड झाली. बेस्ट ग्रूप डान्स साठी अभिषेक कार्ले आणि फॅमिली यांना बक्षीस देण्यात आले. त्याचबरोबर १५ लकी ड्रॉ मार्फत उपस्थितांना बक्षिस देण्यात आले.

यावेळी एस आर जे स्टील कंपनीचे रिजनल हेड अनिरुद्ध पांडे, अविनाश पुरोहित, विशाल येसेकर तसेच राघवेंद्र सप्लायर्स, श्री वेंकटेश्वरा आर एम सी, सुमतीलाल ॲण्ड सन्स, वैष्णवी टाईल्स ॲण्ड ट्रेडिंग कंपनी, पंकज स्टील ट्रेडर्स, श्री आनंद सेल्स, श्री आनंद ट्रेडिंग कंपनी, इको प्लास्ट, वैष्णवी मार्बल्स, मॉडर्न आर सी सी अँड लाइम वर्क , अर्टीको लिफ्ट, पटेल सिरॅमिक, आबेदिन पैन्ट्स, ए टू झेड कन्स्ट्रक्शन, सम्राट इलेक्ट्रिकल, डाईकेन ए सी सॉल्युशन, अल्सेन ए सी सी ब्लॉक्स, गिरिजा रेडी मिक्स कॉंक्रिट संचालक सहकुटुंब उपस्थित होते. सचिव भूषण पांडव, सांस्कृतीक समिती अध्यक्ष अजय दगडे आणि कमिटी सदस्य अभिजित शिंदे, शैलेश सप्रे, सुरेश परदेशी, सुनिल हळगावकर, चेतन संचेती व वैशाखी हिरे यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी नियोजन पाहिले. अजय दगडे यांनी या कार्यक्रमातील सर्व उपस्थित आणि नियोजनात पुढाकार घेतलेल्या सभासदांचे आभार मानले.

# नागरदेवळे जवळ युवकावर चाकूने वार करत खुनी हल्ला

नगर – जुन्या वादाचा राग मनात धरून १९ वर्षीय युवकावर चाकूने वार करत लोखंडी फायटरने मारहाण करून त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना नागरदेवळे शिवारात शेलार मळा येथे १४ ऑक्टोबर रोजी रात्री ७.४५ च्या सुमारास घडली. रेहान गालिब खान (रा. बुऱ्हाणनगर) असे या हल्ल्यात जखमी झालेल्या युवकाचे नाव असून या प्रकरणी तिघांवर भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जखमी रेहान याने दवाखान्यात उपचार घेत असताना पोलिसांना दिलेल्या जबाबात म्हटले आहे की, त्याचे आणि सलमान शेख (रा. कापूरवाडी, ता.नगर) याचे ३ महिन्यापूर्वी वाद झाले होते. याबाबत रेहान याने भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्यादही दिली होती. १४ ऑक्टोबर रोजी रात्री ७.४५ च्या सुमारास तो आणि त्याचा मित्र हे दोघे मोटारसायकल वर नागरदेवळे येथे व्यायाम करण्यासाठी जात असताना सलमान रफीक शेख,अभी गोरख धाडगे व हर्षवर्धन तापकिरे हे तिघे समोरून आले.

त्यातील हर्षवर्धन तापकिरे हा म्हणाला की, काय रे आमच्या कडे पाहून थुंकतो काय, तर सलमान शेख म्हणाला हा लय माजला आहे. यापूर्वीही त्याने माझ्यावर केस केली आहे, आज याला जीवे मारून टाकू असे म्हणत तिघांनी रेहान याला लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरु केली. सलमान शेख याने त्याच्या कमरेचा चाकू काढून रेहानच्या डोक्यात वार केले. तर अभी धाडगे याने लोखंडी फायटर ने तोंडावर मारून जखमी केले. त्यावेळी रेहान हा जीव वाचविण्यासाठी तेथून पळाला. त्यानंतर त्याच्या मित्राने त्याला दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. असे रेहान याने जबाबात म्हंटले आहे. त्यावरून पोलिसांनी तिघांवर बीएनएस कलम १०९, ११५ (२), ३५१ (२) (३), आर्म ॲक्ट ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# शेतकऱ्यांनी नाविन्यपूर्ण प्रयोगातून उत्पन्न वाढवावे

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आवाहन; अकोळनेर येथे शेती प्रकल्पांची केली पाहणी





अकोळनेर येथे फुलशेती, फळशेती व पॉलीहाऊस प्रकल्पांची जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला.

नगर – शेतकऱ्यांनी फुलशेतीत उत्पादनवाढीसाठी वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. पाण्याचा कार्यक्षम वापर व कीडनियंत्रणासाठी समन्वित पद्धत अवलंबावी. अशा नाविन्यपूर्ण प्रयोगांतून शेतीत उत्पन्नवाढ साधावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

अहिल्यानगर तालुक्यातील मौजे अकोळनेर येथे फुलशेती, फळशेती व पॉलीहाऊस प्रकल्पांची जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांच्या शेतीतील अडचणी, पिकांवरील प्रादुर्भाव, बाजारपेठेतील विक्रीसंबंधी प्रश्न तसेच हवामानातील बदलामुळे होणारे परिणाम याविषयी त्यांनी सविस्तर माहिती घेतली. कृषी विभागाला शेतकऱ्यांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, गटविकास अधिकारी राजेंद्र देसले व तालुका कृषी अधिकारी अशोक वाळके उपस्थित होते.

या पाहणीदरम्यान शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी आपले अनुभव मांडले. जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या उत्साहाचे कौतुक करून, शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन शाश्वत शेतीकडे वाटचाल करावी, असे आवाहन केले.

यानंतर जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी 'ऑरेंज व्हॅली फार्मर्स प्रोड्युसर कंपनी'ला सदिच्छा भेट दिली. कंपनीच्या कार्यपद्धती, शेतमाल प्रक्रिया व बाजारपेठ उपलब्धतेबाबत माहिती घेत जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांना एकत्रितपणे कृषी क्षेत्रात मूल्यवर्धन करून रोजगारनिर्मिती साधण्याचे आवाहन केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी संदीप वर्पे यांची नियुक्ती

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर



उत्तर जिल्हाध्यक्षपदी कोपरगाव येथील संदीप गोरक्षनाथ वर्पे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेने प्रदेश सरचिटणीस रवींद्र पवार यांनी या नियुक्तीचे पत्र काढले आहे.

संदीप वर्पे हे पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचे निष्ठावंत असून त्यांनी गतवर्षी कोपरगाव विधानसभा मतदार संघातून पक्षातर्फे निवडणूकही लढविली होती. तसेच यापूर्वी त्यांनी पक्ष संघटनेत विविध पदांवर काम केलेले आहे. त्यांची पक्षाने उत्तर नगर जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती केली असून पक्षाने प्रथमच उत्तर आणि दक्षिण अशी पदांची विभागणी केली आहे.

# राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षपदाचा राजेंद्र फाळके यांचा राजीनामा

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असून तसे पत्र त्यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे दिले आहे.

पत्रात असे निवेदन दिले आहे की, खा. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व तत्कालीन प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली मी २०१८ मध्ये अहिल्यानगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जिल्हाध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला होता. आज जवळपास ७ वर्षाहून अधिकचा काळ झालेला असून पक्षामध्ये नवीन चेहऱ्याला संधी मिळणे अपेक्षित असते तसेच माझे कौटुंबिक कारणास्तव मी माझ्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# जनहिताच्या कामांच्या माध्यमातून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सूचना, अहिल्यानगर तालुक्यातील विविध विकासकामांचा आढावा



अहिल्यानगर तहसील कार्यालयात तालुक्यातील विविध विकासकामांचा जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी आढावा घेतला.

नगर – अधिकाऱ्यांनी सध्यस्थितीत सुरू असलेली व प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करावी. सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी जनहिताच्या कामांच्या माध्यमातून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

तहसील कार्यालयात तालुक्यातील विविध विकासकामांचा आढावा घेताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, पोलीस उपअधीक्षक (ग्रामीण) शिरीष वमणे, पोलीस उपअधीक्षक (शहर) दिलीप टिपरसे व तहसीलदार संजय शिंदे उपस्थित होते. या बैठकीत पिण्याचा पाणीपुरवठा, रस्ते बांधकाम, सिंचन प्रकल्प, आरोग्य सेवा, शिक्षण सुविधा, ग्रामविकास योजना, स्वच्छ भारत मिशन, कृषी क्षेत्रातील प्रगत उपक्रम व इतर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व योजनांची कार्यक्षम अंमलबजावणी सुनिश्चित करून नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा, असे निर्देश दिले.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त तहसील कार्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# रात्रीच्या वेळी संशयास्पदरित्या लपून बसणाऱ्या तरुणाला पकडले

नगर – रात्रीच्या वेळी संशयास्पद रित्या टपरीच्या आडोशाला लपून बसलेल्या तरुणाला कोतवाली पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. ही कारवाई मार्केट यार्ड पाठीमागील महात्मा फुले चौकात १५ ऑक्टोबर रोजी रात्री ८.५० च्या सुमारास करण्यात आली.

सुरज किरण जाधव (वय २०, रा. नवीन गावठाण कन्या शाळेजवळ, केडगाव, हल्ली रा.दत्त मंदिराजवळ आलमगीर रोड, भिंगार) असे पकडलेल्या तरुणाचे नाव आहे. कोतवाली पोलिस ठाण्यातील पोलिस पथक रात्रीची गस्त घालत असताना सुरज जाधव हा महात्मा फुले चौकात टपरीच्या आडोशाला अंधारात संशयास्पद रित्या लपून बसलेला आढळला. त्याला तेथे थांबण्याचे कारण विचारले असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही, त्यामुळे त्याला ताब्यात घेत त्याच्याविरुद्ध पोहेकॉ. भानुदास सोनवणे यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र पोलिस कायदा १९८८ चे कलम १२२ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# फार्म हाऊसमध्ये घुसून तलवार, पिस्तुलाच्या धाकाने ९७ हजार रुपयांची लूट

नगर – घाणेगाव (ता. नगर) शिवारातील एका फार्महाऊसवर घुसून, मॅनेजरच्या डोक्याला पिस्तुल आणि मालकाच्या मानेला तलवार लावून ९७ हजार २०० रूपयांचा ऐवज लुटून नेल्याची घटना १३ ऑक्टोबर रोजी दुपारी तीनच्या सुमारास घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ज्ञानेश्वर उध्दव शिरसाठ (वय ४०, रा. कौठा, ता. नेवासा) यांनी फिर्याद दिली आहे. राहुल प्रकाश मांढरे (रा. स्वास्थ हॉस्पिटलच्या पाठीमागे, लालटाकी, अहिल्यानगर), मनोज कराळे, ज्युनेद इनामदार (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) व पाच अनोळखी महिला यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्ञानेश्वर शिरसाठ यांचे घाणेगाव शिवारात फार्महाऊस आहे. १३ ऑक्टोबर रोजी दुपारी राहुल मांढरे, मनोज कराळे, ज्युनेद इनामदार आणि त्यांच्यासोबतच्या पाच अनोळखी महिलांनी फार्महाऊसमध्ये बेकायदेशीरपणे प्रवेश केला. त्यांनी फार्महाऊसचे मॅनेजर मयुर विलास जाधव यांच्या डोक्याला पिस्तुल लावून जीवे मारण्याची धमकी दिली.

त्यानंतर त्यांच्या खिशातील २ हजार २०० रूपये रोख, गळ्यातील सुमारे ८० हजार रूपये किमतीची एक तोळ्याची सोन्याची चेन जबरदस्तीने हिसकावून घेतली. त्यानंतर संशयित आरोपींनी ज्ञानेश्वर यांच्या मानेला तलवार लावून त्यांना फार्महाऊसवरून हाकलून दिले. जाताना संशयित आरोपींनी पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने फार्महाऊसमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर आणि हार्डडिस्कही चोरून नेली. याप्रकरणी ज्ञानेश्वर शिरसाठ यांच्या फिर्यादीवरून राहुल मांढरेसह इतर संशयित आरोपींवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोंढे करीत आहेत.

# घरातून सोन्याच्या मंगळसुत्राची चोरी

नगर – घरात दिवाणवर उशीजवळ ठेवलेले १ तोळा वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना स्टेशन वरील आनंदनगर येथील स्वामी अपार्टमेंट येथे १४ ऑक्टोबरला दुपारी ३ ते रात्री ९.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत दिव्या वैभव देवकर (रा. स्वामी अपार्टमेंट, आनंद नगर, स्टेशन रोड) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या १४ ऑक्टोबर रोजी घरी असताना त्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र हे घरातील दिवाणवर उशी जवळ ठेवले होतो. रात्री त्यांना ते तेथे दिसून आले नाही. त्यामुळे त्यांनी व त्यांचे पती यांनी घरात सर्वत्र शोध घेतला मात्र ते मिळून न आल्याने सदर मंगळसुत्र अज्ञात व्यक्तीने चोरून नेले असल्याची त्यांची खात्री झाली. त्यामुळे त्यांनी १५ ऑक्टोबर रोजी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून चोरट्याविरोधात बीएनएस कलम ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यास येते की, मिळकतीचे वर्णन– जि.प. तुकडी अहिल्यानगर पोट. तुकडी तालुका अहिल्यानगर गाव **वाळुंज** हद्दीमधील गट नं. ३४३ क्षेत्र २ हे २१ आर याचा आकार ७ रू ०० पै यापैकी मल्लेशाम अंजय्या इगे यांचे क्षेत्र ० हे ३३ आर शेतजमीन त्यामधील तदंगभूत वस्तू व हक्कासह यासी आकार रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे, यासी चतु:सिमा– **पुर्व**–गट नं. ३४०, **पश्चिम**– गट नं– ३४१ व ३४२, **उत्तर**–गट नं ३२९ लक्ष्मण अंजय्या इगे यांची जमीन, **दक्षिण**–गट नं ३४३ पैकी. सदर मिळकत मल्लेशाम अंजय्या इगे यांच्या मालकी हक्क वहिवाटीची आहे. या मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिला बरोबर सदर मिळकत विक्री करण्याबाबत सौदा निश्चीत केलेला असून विद्यमान मालकांनी सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित असल्याबाबत तसेच सदर मिळकत ही कोणत्याही न्यायालयाचा वाद विषय झालेला नाही व कोणताही वाद विषय न्यायप्रविष्ठ नाही. याबाबत आमचे अशिलास खात्री व विश्वास दिलेला आहे. तथापि सदर मिळकतीबाबत कोणाचा काही दावा, करार, मदार, अन्न वस्त्र, चोळी–बांगडी, भाडेपट्टा, गहाण दान, बक्षिसपत्र, साठेखत, हितसंबंध, विसारपावती वगैरे स्वरूपाचा हक्क असल्यास त्यांनी परस्पर वर्तमानपत्रामध्ये हरकती अगर उत्तर देवू नये. सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत कागदपत्रासह लेखी हरकत आमच्याकडे खालील पत्यावरच नोंदवावी. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही व सदरची मिळकत निर्वाद असल्याचे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे नोटीस असे.

अशिलातर्फे व करिता
**ॲड. सौ. ललिता संजय म्हस्के**
प्लॉट नं.६७ आदर्शनगर, नागापूर
अहमदनगर, मो : ९७६३५०७७४७

अहमदनगर
दिनांक– १६/१०/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **रजनी मनोज भंडारी ,रा. सावेडी,अहिल्यानगर** यांनी सदरील प्लॉट मिळकत आज रोजी निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देऊन ती आमचे अशिलांस खरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. आमचे अशिल हा खरेदी व्यवहार लवकरच पुर्ण करण्याचे विचारात आहेत.तत्पुर्वी या मिळकतीची विद्यमान मालकांची मालकी व मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खातरजमा करून घेण्याच्या उद्देशाने ही जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे.सबब ज्या कोणाचीही कसलाही कायदेशीर अधिकार,हक्क, अथवा हितसंबंध या मिळकतीत असतील अशाने ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले दिवसांपासून ७ दिवसांचे आत त्याचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाच्या कागदोपत्री पुराव्यानिशी खाली सही करणाऱ्यांकडे समक्ष भेटुन त्याची खातरजमा करून घ्यावी व या व्यवहारास लेखी हरकत घ्यावी.या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरून आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पूर्ण करेल व मग कोणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट** :– जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु.ता.नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे केडगांव** येथील मे.दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कक्षेतील खालील तपशीलाचा प्लॉट याचे वर्णन खालीलप्रमाणे :–

| स.नं. | प्लॉट नं. | एकुण क्षेत्रफळ |
| --- | --- | --- |
| ४९४/२/७ | ६ | १.६१.८४ आर/चौ.मी.(१६१.८४ चौ.मी.) |

हा संपुर्ण क्षेत्राचा मोकळा प्लॉट आमचे अशिलांस खरेदी देणेचे ठरले आहे. **यांसी चतुःसिमा** :–
पुर्वेस :– ६ मी. रूंदीचा रस्ता. दक्षिणेस :– प्लॉट नं.७.
पश्चिमेस :– प्लॉट नं. १६. उत्तरेस :– ९ मी.रूंदीचा रस्ता.
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वकची मिळकत.नोटीस दिली ता.१६.१०.२०२५.

**ॲड.निहालअहमद बाबुलाल बागवान**
श्रेयस लॉनच्या मागे,सैनिक कॉर्नर,
तपोवन रोड, भिस्तबाग,अहमदनगर.
मो.नं.९९२१३ ५५७७८.

**ॲड.विजय प्रल्हाद अत्रे**
पूर्णश्री,प्लॉट नं. २८,
गावडे मळा,भिस्तबाग,अहमदनगर.
मो.नं.९८२२० ४३९६७.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता.१६/१०/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे सावेडी येथील खालील वर्णनाची मिळकत–

**सर्व्हे नंबर २४/१ब/२ब/१अ१/३ मधील प्लॉट नं.१ चे एकुण क्षेत्र ४४२.२१ चौ.मी. यावर बांधलेल्या इमारतीचे नांव –''गिता अपार्टमेंट''** यापैकी

**अ) ग्राऊंड फ्लोअरमधील दुकान नं.२ चे एकूण क्षेत्र १३.७२ चौ.मी. यांसी चतुःसीमा**
पूर्वेस :– फ्लॅट नं.१ दक्षिणेस :– दुकान नं.२
पश्चिमेस :– रस्ता उत्तरेस :– दुकान नं.३

**ब) ग्राऊंड फ्लोअरमधील फ्लॅट नं.००१ चे एकूण क्षेत्र २४.३८ चौ.मी. यांसी चतुःसीमा**
पूर्वेस :– जीना दक्षिणेस :– साईड मार्जीन
पश्चिमेस : दुकान १ व २ उत्तरेस :– दुकान नं.३ व ४

**वर नमूद मिळकतीचे विद्यमान मालक – ओमप्रकाश कौडामल कुकरेजा**
रा. गिता अपार्टमेंट, सावेडी, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग,
चितळे रोड, अहमदनगर. मो. नं. 9011678999. 9860805559

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **प्रल्हाद वासुदेव सोनार ,राजेंद्र वासुदेव सोनार, संजय वासुदेव सोनार रा. ३३१७,ख्रिस्त गल्ली,अ.नगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून विद्यमान मालक व सदर मिळकती मधील असलेले भाडेकरु लक्ष्मी गणेश देवकाते व राजाभाऊ माधवराव देवकाते यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे. या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा,लिज, गहाण, दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :** जिल्हा तुकडी अहिल्यानगर / अहमदनगर, तालुका नगर पैकी, महानगरपालिका हद्दीतील, **शहर अहिल्यानगर** येथील **जुना मंगळवार बाजार भागातील** मे.दु.निबंधक साहेब, अहिल्यानगर/अहमदनगर यांचे कक्षेतील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे–

१) सि.स.नं.–५२४४ चौ.मीटर–९६.१० ही संपुर्ण जागा.
**यांसी चतुःसिमा :**–
पुर्वेस :– सि.स.नं.५२४३/अ दक्षिणेस :– सि.स.नं.५२४५
पश्मिचेस :– रस्ता उत्तरेस :– सि.स.नं.५२४३/ब

२) सि.स.नं.–५२४५ चौ.मीटर–७६.९० ही संपुर्ण जागा.
**यांसी चतुःसिमा :**–
पुर्वेस :– सि.स.नं.५२४८/अ दक्षिणेस :– सि.स.नं.५२४६
पश्मिचेस – रस्ता उत्तरेस :– सि.स.नं.५२४४

३) सि.स.नं.–५२४६ चौ.मीटर–८५.३० ही संपुर्ण जागा.
**यांसी चतुःसिमा :**–
पुर्वेस :– सि.स.नं.५२४८/अ दक्षिणेस :–सि.स.नं.५२४७,बोळ व सि.सं.नं.५२२५
पश्मिचेस :– रस्ता उत्तरेस :– सि.स.नं.५२४५

सदर तिन्ही मिळकतीवर एकत्रतिरित्या बांधकाम झालेले असून बांधकामाचे एकुण क्षेत्र २२२.१५ चौ.मी. असून म्यु.घर नं. ३९०६ असा असून सदर संपुर्ण मिळकतीबाबत.

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक
काही एक राखून न ठेविता.
दि. १६/१०/२०२५

ॲडव्होकेट
नाजीम अहमद इस्माईल शेख
कुरेशी फैजान फारुक
जीपीओ रोड,कलेक्टर ऑफिसशेजारी
अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

प्रति.
**श्रीमती राधिका शंकर गाडे,**
रा.सिध्दार्थनगर
ता.जि अहिल्यानगर. : अर्जदार विरुध्द
अधिकारी.जन्म मृत्यू नोंदणी विभाग.
अहिल्यानगर महानगरपालिका.
अहिल्यानगर : सामनेवाले

ज्याअर्थी. अर्जदार **श्रीमती राधिका शंकर गाडे** यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३(३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार श्रीमती राधिका शंकर गाडे** यांचा दि. १८/०५/१९८१ रोजी जन्म झालेला आहे. त्यांची जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी, अर्जदार श्रीमती राधिका शंकर गाडे यांचा दि.१८/०५/१९८१ रोजी जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार श्रीमती राधिका शंकर गाडे यांचे दि.१८/०५/१९८१ रोजीचे जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दि. १०/१०/२०२५ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

प्रति.
**श्री.एकनाथ नामदेव उमाप,**
रा.सिध्दार्थनगर
ता.जि अहिल्यानगर. : अर्जदार विरुध्द
अधिकारी.जन्म मृत्यू नोंदणी विभाग.
अहिल्यानगर महानगरपालिका.
अहिल्यानगर : सामनेवाले

ज्याअर्थी. अर्जदार **श्री. एकनाथ नामदेव उमाप** यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३(३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार श्री.एकनाथ नाम देव उमाप** यांचा दि. ०१/०८/१९७६ रोजी जन्म झालेला आहे. त्यांची जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी, अर्जदार **श्री. एकनाथ नामदेव उमाप** यांचा दि.०१/०८/१९७६ रोजी जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार श्री.एकनाथ नामदेव उमाप यांचे दि.०१/०८/१९७६ रोजीचे जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील.तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दि. १०/१०/२०२५ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमांम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालकाने सदर मिळकतीबाबत आमचे अशिलाबरोबर सौदा करून सदर मिळकत खरेदी देण्याचे कबूल केले आहे. लवकरच आमचे आशिल अटी व शर्तींची पुर्तता झाल्यानंतर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु, कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट, बेनामी अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३ दिवसांचे मुदतीमध्ये खालील पत्त्यावर समक्ष, लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** डि. ।। अहिल्यानगर सब डि. ।। तालुके अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांचे हद्दीतील **मौजे माळीवाडा** येथील **फ्लॅट** मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे –

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | एकूण क्षेत्र |
| --- | --- | --- |
| १५/१६/१/२ | २३/३० | १३३७.८४ |

यांसी संगणकीकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे मिळकत वर्णन– गट नं.१५/१६/१/२/प्लॉट/२३/३० चे क्षेत्र १३ आर ३७.८४ चौ.मी.)

**यांसी प्लॉट नं.२३/३० च्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे**–

| पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| --- | --- | --- | --- |
| ६.०० मी.रुंद रस्ता | ६.०० मी.रुंद रस्ता | प्लॉट नं.२२ व ३१ | ६.०० मी. रुंद रस्ता |

यावर बांधण्यात आलेल्या वर्धमान रेसिडेन्सी या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं.१९ कारपेट क्षेत्र ८५. ५९ चौ. मी. व विक्रीयोग्य क्षेत्र १०६. ९९ चौ. मी. ही संपूर्ण फ्लॅट मिळकत.

**यांसी सदर फ्लॅट नं. १९ च्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे** –

| पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| --- | --- | --- | --- |
| साईड मार्जीन | साईड मार्जीन | फ्लॅट नं.२० व स्टेअर केस | फ्लॅट नं.१८ |

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक– सौ.निलीमा सचिन भंडारी,**
रा.सर्व्हे नं.१३५ ते १३८, प्लॉट नं.९ अ,सारसनगर,
मार्केटयार्डमागे, अहमदनगर–४१४००१

**ॲड. विजय आर. गुंदेचा**
(बी.कॉम.,एल.एल.एम.,सी.एस.,डी.टी.एल.,डी.एल.एल.ॲण्ड एल.डब्ल्यु., जी.डी.सी. ॲण्ड ए.)
**किमया विजय गुंदेचा** (बी.एस.एल.,एल.एल.बी., जी.डी.सी. ॲण्ड ए.)
ऑफिस नं. २०८, ग्राऊंड फ्लोअर, करण कोर्ट बिल्डींग, जुन्या जिल्हा न्यायालयासमोर,
दादा चौधरी विद्यालयाजवळ, अहिल्यानगर, मो. नं. ९२७१४६१८४६

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

**मागणी सूचना**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र. ११ दुसरी गल्ली, सिनातोफा रोड, अलवारपेट, तेनमपेट, चेन्नई–६०००१८; **मुख्यालय** : लेव्हल – ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी–२, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी नमूद केलेले कर्जदार यांनी टुहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी होम फायनान्स लिमिटेडचे असे म्हणणे आहे की, हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहात. म्हणून या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम २००२ (सरफेसी कायदा) अन्वये आणि कलम – १३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्तावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सूचनेव्यतिरिक्त, त्यांना या जाहिर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.

कलम १३ (२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार, सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रक्कमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदार/सह–कर्जदार/नाव आणि पत्ता | सुरक्षित मालमत्तेचा पत्ता | मागणी सुचनेनुसार दिनांक आणि थकबाकी रक्कम रुपयात |
| --- | --- | --- |
| लोन क्रमांक – SHLHAMDR0000589<br>१. श्री. प्रेमकुमार सीताराम वर्मा (कर्जदार)<br>२. श्री. मंजुषा सीताराम वर्मा (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: डी–११०१ सर्व्हे क्रमांक २७५/१ आणि २७६/१, ट्रेंड होम्स, डी विंग, फेज २, हिंजवडी – जवळ इन्फोसिस बिल्डिंग, हिंजवडी हिंजवडी, पुणे महाराष्ट्र भारत ४११०५७<br>मालमत्तेचा पत्ता : २८२९ ,घरोंडा सहकारी गृह निर्माण संस्था, ३० ३१ ३२ ३३, विनायक नगर, चाहुराणा बु. अहमदनगर–४१४००५<br>कर्जाची रक्कम – रु. २३,०३,३४६/–<br>लोन क्रमांक – SHLHAMDR0000589<br>एनपीए दिनांक : ०३/१०/२०२५ | सर्व तुकडा आणि पार्सल रो हाऊस ब्लॉक क्रमांक २८ ए आणि २९ ए, १४७६.८७ चौ. मीटर, प्लॉट क्रमांक ३०/३१/३२/३३, घरोंडा सहकारी गृह निर्माण संस्था, सर्व्हे.क्र. १३५/१/१३५/२, प्लॉट क्षेत्र: ५२० चौ. फूट, बांधकामासह ३९० चौ. फूट, विनायक नगर, दत्त मंदिराजवळ नालेगाव, ए/पी. चाहुराणा बु., ता. नगर, जिल्हा अनमेदनगर. पिन कोड– ४१४००५. आणि ज्याच्या आत सीमा आहे खालीलप्रमाणे :<br>पूर्वेकडे : ब्लॉक क्रमांक ३० ए<br>पश्चिमेकडे : रो ब्लॉक क्रमांक २७ ए<br>दक्षिणेकडे: रस्ता उत्तरेकडे: रस्ता | मागणी सूचना तारीख – १०–१०–२०२५<br>मागणी सूचना रक्कम– कर्ज खाते क्रमांक SHLHAMDR0000589 च्या संदर्भात दिनांक ०८–१०–२०२५ रोजी रु. २४,०६,७३७/– (चोवीस लाख सहा हजार सातशे सदतीस फक्त). आतापर्यंत नमूद केलेल्या आणि अनुषंगिक खर्च, खर्च इत्यादींनुसार पुढील व्याजासह. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते की, ही नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम १३ (१३) नुसार सदर वर्णीत मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री, भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण: अहिल्यानगर
दिनांक: १६–१०–२०२५

सही/– अधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

